विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २०११ |
| वर्ष | : | बारावे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४३ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०११**

**गणपत्रिका क्रमांक : १६१**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष बारावे/अंक १ /जानेवारी २०११

## संपादकीय

## भ्रष्टाचार का?

आजची वर्तमानपत्रे व दूरदर्शनच्या माध्यमांतून बाहेर येणारी भ्रष्टाचाराची प्रकरणे बघून मन सुन्न झाल्याशिवाय राहत नाही. आपल्या जीवनाचे असे एकही क्षेत्र राहिले नाही की ज्यात भ्रष्टचार नाही, आणि म्हणूनच याचा विचार, म्हणजे याची कारणमीमांसा अधिक गांभीर्याने व्हायला हवी.

मनुष्य कधीच एकटा जगत नसतो. घरापासून दारापर्यंतचे त्याचे जगणे सामूहिक असते. हे जगणे संतुलित व सुरळ होण्याकरता किमान नियमांचे पालन करावे लागते. वैयक्तिक वा घरातील नात्यागोत्यांच्या संबंधाचे जीवन, अथवा समाजजीवनातील व्यवहारांचे जीवन जगताना अशा नियमांचे पालन हे अनिवार्य असते. आपण मानव जातीचा इतिहास बघितला, तर सगळ्या मानव समूहांत अशा दोन स्तरांवर नियमांचे पालन अनेक शतके करण्यात येत आहे. यामधला मुख्य मुद्दा हा व्यक्तीच्या 'क्षमता' व 'स्वातंत्र्य' यांचाच असतो. या संकल्पना अधिकाधिक संतुलित व सुरळ करण्याकरताच नीतिनियम, सामाजिक निर्बंध यांची योजना केली जाते.

भारत आणि विशेषत: हिंदू समाजाचे हे वैशिष्ट्य आहे की, त्याच्या सामाजिक रचना आणि व्यक्ती विकासाच्या संकल्पना जास्तीत जास्त व्यवहार्य आहेत. वर्णाश्रमापासून लग्न संस्थेपर्यंतचा विचार हा व्यक्तिगत व सामाजिक जीवन सुरळ व आनंदित करण्याकरताच आहे. यामध्ये एखाद्या व्यक्तीच्या तात्पुरत्या फायद्यातोट्याचा विचार न करता, दूरगामी, शाश्वत, स्थिर समाजाच्या निर्मितीकरता प्रयत्न केलेले दिसून येतात आणि म्हणूनच, या नीतिनियमांची चौकट म्हणजे बंधने वा स्वातंत्र्याचा संकोच नसून दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा केलेला तो आदर असतो. बहुतेक सर्व मानवाच्या क्षमता या कमी अधिक प्रमाणात सारख्याच असतात. पण तरीही त्याचे वय, लिंग आणि त्यानुसार बदलणारी कर्तव्ये यांना समांतर अशी नियमांची व्यवस्था केलेली असते. क्षमतेपुरताच विचार केला तर कुठलाही पुरुष कुठल्याही स्त्रीबरोबर वा कुठलीही स्त्री ही कोणत्याही पुरुषाबरोबर पौगंडावस्थे नंतर शरीरसंबंध ठेवण्याच्या क्षमतेची असते. तरीही व्यापक समाजजीवन सुसह्य करण्याकरता 'लग्न' संस्थेची रचना करावी लागते. ती करारापेक्षा 'संस्कार' म्हणून रुजवावा लागतो. 'करार' हा तांत्रिक असतो, तर 'संस्कार' अनेक वर्षांच्या मशागतीतून निर्माण होतो.

दिल्लीच्या उच्च न्यायालयाने नुकताच दिलेला एक निर्णय असाच धक्कादायक आहे. (टाईम्स ऑफ इंडिया, बुधवार, १९ जाने. पृ. १५) १८ वर्षांवरील महिलांना विवाहित पुरुषाबरोबर संबंध ठेवण्याचे अधिकार कोर्टाने प्रदान केले आहेत. १८ वर्षांवरील स्त्रीला तिची जीवनशैली आणि जीवन जगण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद या

(मलपृष्ठ २ वर)

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष बारावे / अंक १/ जानेवारी २०११

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
श्री. मोहन पाटक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ७ वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ ११११
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | खासदारांची पगारवाढ - कायदाशिल्पकारांसाठी कायदा | श्रीमती श्रीविद्या जयकुमार | ३ |
| २) | इंट्रिग्रल योगाचे ज्येष्ठ साधक ऋग्वेद भाष्यकार श्री कपाली शास्त्री | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ६ |
| ३) | ८४ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ठाणे २०१० | श्री. यशवंत साने | १० |
| ४) | स्त्री जीवनात विज्ञान पहाट ..... | सौ. सुनीता गणपुले | १८ |
| ५) | पसायदान | श्री. शं. बा. मठ | २३ |
| ६) | मराठी कवितेचा प्रवास | प्रा. दामोदर मोरे | ३२ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा आणि स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून, संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# खासदारांची पगारवाढ - कायदाशिल्पकारांसाठी कायदा

*'लोकप्रतिनिधींना पगार असावा का' हा नेहमी वादाचा ठरलेला विषय आहे. अलीकडेच खासदारांनी पगार वाढवून मागितले व हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला - संपादक*

संसदेत खासदारांच्या पगारवाढीसंबंधीत नुकत्याच झालेल्या गदारोळामुळे आपल्या देशावर लाजिरवाणी परिस्थिती आली आहे. स्वत:च्याच लठ्ठ पगारासाठी नारेबाजी आणि कामगारांप्रमाणे केलेला विरोध हा या खासदारांकडून अपेक्षित नव्हता. सभागृहात 'उपहासिक संसद' रचणे हेच लाजिरवाणे होय. संसद हे लोकांच्या स्वप्नांचे प्रतीक आहे. संसदेचे सार्वभौम अधिकार व प्रतिष्ठा यांचं संरक्षण हे खासदाराचं प्रथम कर्तव्य आहे.

खासदारांनी स्वत:चे पगार व इतर सुविधा स्वत:च ठरविणे कितपत योग्य आहे? जेव्हा पगार इत्यादी यांची अंमलबजावणी करायचा प्रस्ताव येतो तेव्हा असे अधिकार अधिक आक्षेपार्ह असतात. भारतीय संविधानातल्या एकशे सहाव्या कलमाप्रमाणे खासदारांचे पगार आणि सवलती, या वेळोवेळी संसदेने पारित केलेल्या कायद्याप्रमाणे ठरतात. संसदेने खासदारांचे पगार, सवलती आणि निवृत्तिवेतन या संबंधी "Salaries, Allowances and Pension of MPs Act 1954" प्रमाणे अंमलबजावणी करायची आहे. मे २००९ पासून खासदारांच्या पगारामध्ये पूर्वलक्षी तिप्पट वादविषयक दुरुस्ती सुचविलेल्या विधेयकाला लोकसभेमध्ये मंजुरी मिळाली. एक उत्साहवर्धक घटना अशी घडली की अनेक खासदारांनी या संबंधी सभात्याग करून एका नि:पक्ष मंडळाकडून खासदारांच्या वेतन संबंधित निर्णय घ्यावा अशी मागणी केली. आपल्याला असा विचार करावा लागेल की जरी खासदारांना दिलेल्या अधिदानाबद्दल आक्षेप असण्याचे कारण नसले तरी 'पगार' हा शब्द या जागी कितपत योग्य आहे? खासदार हे जनतेचे प्रतिनिधी असून त्यांना नोकरीप्रमाणे कुठल्याही प्रकारचे दैनंदिन काम नसते. लोकशाहीत प्रतिनिधित्व हे महत्वाचे असून एक थोर सार्वजनिक सेवा आहे व या ठिकाणी अधिदानाला मानधन हा शब्द जास्त सयुक्तिक ठरेल. खासदारांच्या पगारवाढीविषयी एक कायम स्वरूपी अथवा हंगामी समिती नेमण्याची तरतूद "Salaries, Allowances and Pension of MPs Act 1954" मध्ये करण्यात यावी, ही वेळ आलेली आहे. या समितीची शिफारस ही संसदेवर बंधनकारक असावी.

आश्चर्य म्हणजे खासदारांच्या पगार व वेतन या संबंधी अधिकार संसदेलाच देण्यामागे घटना समितीच्या सदस्यांना काहीच गैर वाटले नव्हते. कुणीही औचित्याचा प्रश्न मांडला नाही! (२० मे १९४९) अधिदानाच्या प्राप्ती व प्रमाणासंबंधी पण विशेष चर्चा झाली नाही. ''खासदारांचा पगार हा एका मंत्रिमंडळ सदस्याच्या पगाराच्या एक चर्तुथांश पेक्षा जास्त आणि एक तृतीयांश पेक्षा कमी असावा'' अशी घटनेमध्ये तरतूद असावी असा प्रस्ताव श्री. पी. लारी यांनी मांडला. मात्र ह्या प्रस्तावाला जोरदार विरोध झाला आणि हा प्रस्ताव फेटाळला गेला. त्यांचा दुसरा प्रस्ताव असा होता की, विरोधी पक्ष नेत्याला मंत्रिमंडळ श्रेणी नसलेल्या मंत्र्यांएवढा पगार मिळावा. हा प्रस्ताव सुद्धा विरोधामुळे फेटाळला गेला. श्री. विश्वनाथ दास यांच्या मते खासदारांना कुठलीही ठराविक पगारश्रेणी नसावी आणि या खासदारांनी संसदेने दिलेल्या भत्त्यामध्ये संतुष्ट राहून काम करण्यास तयार असावे. श्री. पी. एस. देशमुख म्हणाले की, ''भविष्यकाळात संसदेने त्यांच्या इच्छेने विरोधी पक्ष नेत्याचे वेतन ठरवावे व खासदार आणि

इतर सरकारी कर्मचारी यांच्या पगारांमध्ये परस्परसंबंध ठरवावा. संसदेने सुज्ञ जनतेचा विरोध पत्करून खासदारांना पुरेसा पगार द्यावा जेणेकरून हे खासदार इतर मार्गांपासून उपलब्ध असलेल्या लाभाकडे आकर्षित होणार नाहीत'' अशी अपेक्षा श्री. देशमुख यांनी संसदेकडे व्यक्त केली.

सरकारी कर्मचारी, शिक्षक इत्यादी यांच्या पगारासंबंधी शिफारसी या कायम अधिक जबाबदारी, अपेक्षा, पात्रता यांच्याशी संलग्न असतात. गेल्या ६० वर्षांत खासदारांविषयी किमान पात्रता, वय व नागरिकत्व याच राहिलेल्या आहेत. घटनेच्या कलम १०२ च्या इतर तरतुदी व्यतिरिक्त, जर एखाद्या खासदाराने संसदेने घोषित केलेले खाते सोडून कुठलेही सरकारी लाभदायी खाते स्वत:कडे ठेवले, तर त्या खासदाराचे सदस्यत्व रद्द समजण्यात येईल. 'The Parliament (Prevention of Disqualification) Act, 1959' मध्ये अशा अनेक खात्यांची नोंद आहे. सौ. जया बच्चन यांच्या घटनेनंतर अनेक इतर खात्यांची पुर्वलक्षी नोंद या कायद्यामध्ये करण्यात आली. घटनेमध्ये संसदेला आपल्या सदस्यांचे केवळ पगार व भत्तेच नाही तर पात्रता, अपात्रता (कलम ८४ व १०२) व हक्क (कलम १०५) ठरविण्याचे सुद्धा अधिकार आहेत. यामुळेच कदाचित कुठल्याही गुन्हयाबद्दल शिक्षेनंतर संबंधित कलमामध्ये (ss 6 to 10A) सहा वर्षांपेक्षा जास्त काळाची अपात्रता असण्याबद्दलची तरतूद नाही.

तसेच निवडणूक आयोगाला हा अपात्रतेचा काळ कमी करण्याचा अधिकार आहे. पण अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी हा काळ किती व कुठल्या कारणास्तव कमी करायचा या प्रकारचे कुठलेही मार्गदर्शन ठरवले गेलेले नाही (s.11, Representation of People Act) जन्मठेप अथवा मृत्युदंडाची शिक्षा मिळाल्यावर सदस्यत्व अपात्र ठरविण्यात येते, पण इतर कुठल्याही कारणामुळे सदस्यत्व अपात्र ठरविण्यात येत नाही. एखाद्या डॉक्टर, वकील किंवा क्रिकेट खेळाडूवरपण संपूर्ण आयुष्यभर बंदी येऊ शकते परंतु खासदारावर येऊ शकत नाही. एखादया खासदाराच्या शिक्षेला माफी जरी मिळाली तरी त्याची अपात्रता रद्द होत नाही, असा निकाल सुदैवाने सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. (Sarat Chandra v Khangendranath 1961).

एखादया खासदाराने जर शिक्षा झाल्यानंतर पुनरावलोकनासाठी अर्ज केला असेल तर त्याचे सदस्यत्व अपात्र ठरविण्यात येत नाही. पुनरावलोकनाचा अर्ज सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊ शकतो. कनिष्ठ व उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला काहीच महत्त्व नाही का? न्यायप्रक्रियेत किती विलंब होतो हे तर सर्वांनाच माहिती आहे. जर फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळेच पात्रता रद्द करण्यात येऊ शकते, तर अशा प्रकरणात न्यायप्रक्रिया विशेष शीघ्र गतीने पुढे सरकेल अथवा अशा विषयांची सुनावणी थेट सर्वोच्च न्यायालयात केली जाईल असा विचार व्हायाला नको का? कायदा आयोग, निवडणूक आयोग आणि घटना परीक्षण आयोग या तिन्ही संस्थांनी राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावर दिलेल्या अहवालावर संसदेने कोणतीही दखल घेतली नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या मते मतदाराला उमेदवारांबद्दल माहिती जाणून घ्यायचा अधिकार आहे (Union of India v Association for Democratic Rights). अशा माहितीमध्ये उमेदवाराची शैक्षणिक पात्रता, गुन्हेगारी इतिहास आणि संपत्ती यांचा समावेश आहे. अनेक खासदारांनी अजूनही आपल्या संपत्तीबद्दल माहिती जाहीर केलेली नाही. हे सगळं असूनही संसदेने उमेदवारांवर गुन्हेगारी आरोप आणि शिक्षा या संबंधीचीच माहिती फक्त जाहीर करण्याचं बंधन मान्य केलेलं आहे (S 33A, RPA)

खासदार झाल्यावरसुद्धा एखाद्या व्यक्तीला संसदेच्या कारकिर्दीत स्वत:चा व्यवसाय चालू ठेवता येतो. पोटनिवडणूकसुद्धा जेव्हा एखादी व्यक्ती विजयी ठरून

काही महिन्यांसाठीच खासदार बनते, तेव्हा तिला निवृत्तिवेतनासारखी सवलत मिळते. खासदारांनी आपला संपूर्ण वेळ राष्ट्राच्या सेवेसाठी घालवावा यासाठी कुठलाही कायदा नाही. मुंबई उच्च न्यायालयाने नुकत्याच झालेल्या निकालात सरकारला अशी आज्ञा दिली की विश्वविदयापिठामधल्या शिक्षकांकडून अशी हमी घ्यावी की ते आपला संपूर्ण वेळ शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन या कार्यास घालवतील व आपली संपत्ती जाहीर करतील. खासदारांपैकी काही वकील आहेत जे न्यायालयात वकिली करतात आणि सरकारच्या बाजूने प्रकरणे चालवतात आणि त्याबद्दल भरगच्च मोबदलाही घेतात. त्याप्रमाणे जेव्हा एखादया खासदाराने सरकारी कामामध्ये लाभात वाटा मिळविल्यावर त्याची पात्रता रद्द करण्यात येते त्याच अर्थाने वकील खासदारांनी सरकारच्या बाजूने प्रकरणे चालविणे कितपत योग्य आहे?

जर सभागृहाच्या परवानगीशिवाय कुणीही लोकसभा सदस्य सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ सर्व सभांना गैरहजर असेल तर संसद त्या सदस्याची जागा रिकामी आहे असे जाहीर करू शकेल. जर सभागृह चार लागोपाठ दिवस पुढे ढकलले गेले किंवा लांबणीवर पडले तर वरील काळ विचारात घेतला जाणार नाही. ६० दिवस हा खूप मोठा काळ आहे. एका दिवसाच्या उपस्थितीमध्ये किती तास उपस्थिती असावी याबद्दल काही तरतूद दिसत नाही. वरील तरतूद सन १९५० पासून न बदलता तशीच राहिली आहे. संसदेच्या कामकाजाचे दिवस कमी झालेले आहेत. संसदेचे कामकाज कोलमडण्याचे प्रमाण वाढले आहे. चर्चेशिवाय विधेयके मंजूर केली जात आहेत. या सर्व गोष्टींबद्दल विचार होणे आवश्यक आहे.

खासदारांना चांगले मानधन मिळाले पाहिजे. असे चांगले मानधन दिल्याने आपण आपल्या लोकशाहीबद्दलचा विश्वास सार्थ ठरवितो. खासदारांबद्दलचा कायदा हा अतिशय मवाळ दिसून येतो. राष्ट्राला खासदाराचे पगार व भत्ते ठरविण्यासाठीच नाही तर त्यांची पात्रता, अपात्रता, हक्क इत्यादी ठरविण्यासाठी एका नि:पक्ष मंडळ/समिती यांची नक्कीच आवश्यकता आहे. अनेक स्तरांतून याबद्दल सूचना येऊनसुध्दा खासदारांचे हक्क याबद्दल कायदेशीर तरतुदी झालेल्या नाहीत. नि:पक्ष व्यवस्थने संसदेच्या कामकाजाचा आढावा घेऊन त्यात सुधारणा करण्यासाठी शिफारशी केलेल्या पाहिजेत. अशा शिफारशी संसदेवर बंधनकारक असल्या पाहिजेत. या सूचनांमुळे संसदेचे अधिकार कमी होत आहेत, असा गदारोळ उडणार नाही अशी आशा आहे.

**श्रीमती श्रीविद्या जयकुमार**
प्रभारी प्राचार्या, विधी महाविद्यालय

दुकानांतील सहाय्यक, ट्रक ड्रायव्हर या पदांसाठी नोकरी शोधणारे खूप असतात. परंतु केंब्रिज जवळ असणाऱ्या हिंक्स्टन या खेड्यात मॉलिक्यूलर जेनेटिक्स मधील वैज्ञानिक या विशेष पदासाठी काही जागा आहेत. प्लासमोडियम फॉल्सिपरम परजीवींसारख्या जीवाणूंमध्ये बदल घडवून आणण्यासाठी या विशेष संशोधनाची गरज आहे. त्याचप्रमाणे बोन बॉयोलॉजिस्टही (हाड जीवशास्त्री) हवा आहे. त्याला उंदरांच्या अनुवंश शास्त्राचे व अंत:स्रावी ग्रंथीचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. या जागा पोस्टडॉक्टरल पदासाठी असून जवळच्याच ट्रस्ट संगर इन्स्टिट्यूट मध्ये उपलब्ध आहेत.

'नेचर' च्या या अंकातील 'सायंटिस्ट वॉण्टेड' या मथळ्याखाली पुढे असेही म्हटले आहे की, योग्य उमेदवार न मिळाल्यास परदेशांतून उमेदवार निवडला जाऊ शकतो; कारण विज्ञान हे विश्वव्यापी असून बुद्धिमत्तेला राष्ट्रीय सीमा नसतात.

संदर्भ - नेचर: खंड ४६८, १८ नोव्हेंबर १०, पृ ३४६

# इंटिग्रल योगाचे ज्येष्ठ साधक ऋग्वेद भाष्यकार श्री कपालीशास्त्री

लेखांक - ५ वा

*कपाली शास्त्रींच्या वेदाभ्यासासंदर्भातील हा पुढील लेख - संपादक*

कथोपनिषदातील नचिकेताची कथा सर्वश्रुत आहे. वाजश्रावस नावाचा एक कामनावान ब्राम्हण होता. त्याने एकदा विश्वजित यज्ञ केला व त्यानंतर आपणाजवळ असणारी सर्व संपत्ती (गोधन) तो ब्राम्हणांना दान करू लागला. तेव्हां ते पाहून त्याचा मुलगा नचिकेत याच्या मनात विचार आला की त्यांचे दूध काढून घेतले आहे व जननसामर्थ्य नाही अशा गाईचे दान करणारा यजमान आनंदशून्य अशा लोकांत जातो. आणि म्हणून तो आपल्या पित्याला म्हणाला-बाबा, तुम्ही माझे दान कोणाला करणार? पिता काहीच उत्तर देत नाही हे पाहून त्याने पुनःपुन्हा तोच प्रश्न विचारला तेव्हा वाजश्रावस रागावून म्हणाला-मी तुला मृत्यूला देऊन टाकणार आहे. यावर नचिकेत म्हणाला मनुष्य तृणाप्रमाणे मरण पावतो आणि तृणाप्रमाणे पुन्हा जन्म घेतो. जन्म आणि मरण या दोन्ही गोष्टी स्वाभाविक आहेत. तेव्हा मी आनंदाने मृत्यूकडे जाण्यास तयार आहे.

नचिकेत जेव्हा मृत्युच्या राज्यात पोहोचतो तेव्हा यमराज तेथे नसतात. त्यामुळे त्याला ३ दिवस ताटकळत रहावे लागते. ३ दिवसांनी जेव्हा यमराज येतात तेव्हा एक अतिथी ब्राम्हण ३ दिवस आपल्या दारी ताटकळत राहिला हे पाहून ते व्यथित होतात. आणि नचिकेताला तीन वर देतात. यांतील प्रत्येक वराचा उपयोग करून नचिकेत अत्यंत गूढ अशा आध्यात्मिक ज्ञानाची प्राप्ती करून घेतो.

कपाली शास्त्री म्हणतात की या कथेचा पूर्वार्ध हा काहीसा हास्यास्पद आणि अविस्मरणीय वाटला तरी उत्तरार्धांत नचिकेताने प्राप्त केलेले तीन वर आणि त्यायोगे मिळवलेले गूढ आध्यात्मिक ज्ञान हे मानवाला दुष्प्राप्य असल्याने त्याचा खोलवर विचार करणे अगत्याचे आहे.

उपनिषदांपूर्वीच्या वेदवाङ्मयात या कथेचा संदर्भ कुठे सापडतो का त्याचा कपाली शास्त्रींनी प्रथम शोध घेतला आहे. तैतिरिय ब्राह्मणात या कथेचा उल्लेख असल्याचे नमूद करून ते म्हणतात की, कथेपूर्वीच्या भागात एका स्वर्गीय अग्नीचा उल्लेख आहे. आध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त करून मुक्त होऊ पाहणाऱ्या आत्म्याला हा स्वर्गीय अग्नी मृत्युच्या पलीकडे अव्यक्त जगात जाण्यास मदत करतो. हा स्वर्गीय अग्नी नचिकेत अग्नी या नावानेही प्रसिध्द आहे. यानंतर कपाली शास्त्री वळतात ते ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात आलेल्या ऋषिकुमार यमायनाच्या कथेकडे. हा ऋषिकुमार आध्यात्मिक प्रगती साधतो, गूढ ज्ञानाची प्राप्ती करून भौतिक विश्वाच्या मर्यादा पार करतो आणि यमराजांशी संवाद साधतो. कपाली शास्त्री म्हणतात की, हा ऋषिकुमार म्हणजेच नचिकेत असेल का असा एक प्रश्न आहे, मात्र तो गौण आहे. महत्वाचं आणि विचार करण्यासारखं आहे ते यमराज त्याला उद्देशून म्हणतात ते. अरे मुला, तुझ्या मनःशक्तीने निर्माण केलेल्या बिनचाकाच्या आणि एकखांबी असणाऱ्या अशा ज्या रथात आरूढ होऊन तू इथवर आलास तो रथ सर्व दिशांना फिरू शकतो. म्हणजे ज्या मार्गाने तो पुढे आला त्याच मार्गाने तो मागेही जाऊ शकतो. कपाली शास्त्री म्हणतात, 'The very enigmatic form of the hymn, the curious mask of dialogue, the words of riddle used by Yama betray the occult character of the spiritual status Rishi has won"

यानंतर कपाली शास्त्री वळतात ते नचिकेताने मागितलेल्या पहिल्या वराकडे. नचिकेत म्हणतो-''हे मृत्यो, माझा पिता माझ्या संबंधाने शांतचित्त प्रसन्नहृदयी आणि विगतक्रोध होवो. तू मला परत पाठवल्यानंतर माझी ओळख पटून तो माझ्याशी नीट भाषण करो''. थोडक्यात नचिकेताला असं म्हणायचंच की त्याच्या वैयक्तिक चेतनेचा धागा पकडून त्याची भौतिकता प्राप्त करण्यात त्याला यश येवो अथवा त्याची बदललेली आंतरिक व्यवस्था व्यक्त जगातील बाह्य जीवनाशी जुळवून घेण्यात अशा पध्दतीने यशस्वी होवो की ज्यामुळे त्याचे वडील त्याला नचिकेत म्हणून ओळखतील, त्याचा प्रेमभावाने स्वीकार करतील.

या ठिकाणी कपाली शास्त्री असाही विचार व्यक्त करून जातात की वज:श्रावस हे एखादे वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रतीकात्मक असं नाव असण्याची शक्यता नाकारता येत नाही. भौतिक संपत्तीची विपुलता असूनही प्रेरक विचारांसाठी मनाची कवाडं सताड उघडी ठेवणारा असाही त्याचा अर्थ असू शकेल. मात्र अशा प्रकारची ही संकल्पना ब्राह्मणांतील विशिष्ट शब्द योजनेमुळेच निर्माण होत असल्याचे मत व्यक्त करून कपाली शास्त्री त्यातील गूढ अर्थाची शक्यता वर्तवताना म्हणतात.

" If then we choose to take note of Vajashnavas as the outer being and conciousness in the material plenitude of physical existance, Nachiket is the flame of the soul released from the bonds of physical being offered as the last gift of Vajashnavas who conciously owns the material plenty."

व्यक्त केलेल्या या गूढ अर्थाच्या पुष्ट्यर्थ भाष्य करताना कपाली शास्त्री म्हणतात यमाच्या दरबारात नचिकेताचा उल्लेख स्वर्गीय अग्नी म्हणून केला होता हे विसरता येणार नाही.

"He is indeed the fire in the universal being of matter, Life and Mind -spoken of as "trinachiketas" आणि तो मानवी देहामध्ये गुप्त रूपाने वास करतो म्हणून त्यास मानव-पुत्र म्हणून मानलं आहे. यानंतर याच संदर्भात कपाली शास्त्री सुत्रात्मा या संस्कृत शब्दांकडे लक्ष्य वेधतात आणि त्याचा अर्थ विशद करताना म्हणतात-

It is the soul which retains the thread of the personal conciousness in the journey to the other side of life and discoving the exit passage to return to the earth-life.

ऋग्वेदमंत्रातील यमायनाच्या कथेत वर्णिलेली परतीच्या प्रवासाची क्षमता अथवा नचिकेताने मागितलेला पहिला वर या दोन्ही गोष्टी सुत्रात्म्याच्या संकल्पनेशी निगडित आहेत.

जेव्हा एखादा आत्मा भौतिक जाणीवेच्या बंधनातून मुक्त होऊन परमेश्वराशी संबंध प्रस्थापित करतो तेव्हा तो त्या परमेश्वरापासून अशा एका दैवी शक्तीचे ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो, की जी पृथ्वी आणि स्वर्ग यांना जोडणाऱ्या वैश्विक घटनेची अधिपती असते. त्या दैवी शक्तीला स्वर्गीय अग्नी म्हणतात आणि तो वैश्विक अस्तित्वाचा पाया असतो. हाच अग्नी प्रत्येक मानवाच्या हृदयातही सुप्तावस्थेत असतो. आणि जेव्हा तो आध्यात्मिक साधनेने प्रज्वलित केला जातो तेव्हा मानवाला अनुपम शांतीचा प्रत्यय येतो आणि जेव्हां तो भु: भुव:स्व: अशा तीनही पातळ्यांवर (मिनचिकेत) जागृत होतो. याच विषयीचे गूढ ज्ञान नचिकेताने दुसऱ्या वराने यमाकडून प्राप्त केले.

यानंतर कपालीशास्त्री वळतात यमाच्या तिसऱ्या वराकडे तिसऱ्या वराने नचिकेत ज्ञान मागतो ते सर्वश्रेष्ठ सत्याचे ज्यामुळे अस्तित्वाचा उगम, जीवन, मृत्यू, मर्त्यता, अमरत्व या सर्वांविषयी ज्ञान प्राप्त होते. नचिकेताने विचारलेल्या तीन प्रश्नांपैकी या तिसऱ्या प्रश्नाबाबत

सर्वसाधारण समाजात बरेच गैरसमज आहेत, असे कपाली शास्त्री म्हणतात. मानव मरण पावल्यावर पुढे त्याचं काय होतं ते त्याला जाणून घ्यायचं होतं का? मानव मेल्यावर त्याचा आत्मा शिल्लक राहतो याबद्दल त्याच्या मनात काही शंका होती का? हे दोन्ही प्रश्न संभवत नाहीत कारण नचिकेत यमाच्या समोर उभा होता. आणि पृथ्वीतलावर पुन्हा जीवन प्राप्त होण्याचा त्याला वर मिळाला होता. तर मग त्याने यमाला विचारलेल्या तिसऱ्या प्रश्नाचा रोख नक्की काय होता? काय होता त्याचा प्रश्न? जेव्हा माणूस मरतो तेव्हा काहीजण म्हणतात हा तो नाही, तर मग मानवाचं शरीर, मन व जाणीव यापेक्षा असं काही वेगळं असतं का की जे मानव मेल्यानंतरही शिल्लक राहणं आणि नंतर दुसऱ्या शरीराशी संबंध जोडणं?

आता असं जे काही शिल्लक राहतं त्याला आपण आत्मा म्हणू शकतो. पण त्याचा त्या व्यक्तिमात्राशी संबंध असतो का? आणि जर नसेल तर त्या आत्म्यास त्या व्यक्तीचा आत्मा म्हणून संबोधता येईल का? सर्व साधारणपणे आपण जेव्हा माणूस म्हणून विचार करत असतो तेव्हां शरीर, मन, जाणीव आणि आत्मा या सर्वांचा एकत्रितपणे विचार करतो. आणि म्हणून जेव्हां माणूस मरतो तेव्हां त्याचा फक्त आत्मा शिल्लक राहतो असं आपल्याला म्हणता येणार नाही. कारण व्यक्तित्वाशिवाय व्यक्तिभूत आत्म्यास अर्थ उरत नाही. काहीजण असं मानतात की मानवी शरीरामध्ये परमेश्वराचा जो अंश असतो तो मानवी शरीराला, मनाला आधार देण्याचे काम करतो. त्या शरीराचे व मनाचे सर्व भाग तो तटस्थपणे तो अनुभवतो आणि मानवाच्या मृत्युनंतर तो मुक्त होऊन निघून जातो. मानवाला आधार देतो म्हणून मानव म्हणजे तोच असे ज्यांना वाटते ते म्हणतात-तो आहे परंतु मानवी व्यक्तिमत्त्व असल्याशिवाय त्याला तो मानव म्हणून कसे मानायचे असे ज्यांना वाटते ते म्हणतात-हा तो नाही.

यानंतर या संपूर्ण चर्चेला आणखी दोन फाटे फुटतात. त्यातला पहिला मुद्दा म्हणजे मृत्युनंतर ज्या व्यक्तित्वाला आधार देण्याचे काम आत्म्यानं केलेलं असतं त्या व्यक्तित्वाचे गुण घेऊन तो आत्मा मुक्त होतो का? ते गुण, ते स्वरूप त्याला चिकटून असतं का? याबाबत उपनिषदांनी असं स्पष्ट म्हटलं आहे की, हा कायदा अत्यंत सूक्ष्म आहे मानवही जाणिवेच्या निरनिराळ्या स्तरांवर असतो आणि म्हणून एकच कायदा सर्व मानवांना लागू होणार नाही. या विषयांवर माताजींनी केलेलं भाष्य अत्यंत उद्बोधक आहे. माताजी म्हणतात-सर्वसामान्य माणसे त्यांच्या शरीराशी इतकी एकरूप झालेली असतात की भौतिक शरीराच्या विघटनानंतर त्यांचे असे काही शिल्लक उरत नाही. काही मानसिक अथवा भावनिक घटक उरतात; पण ते अमूक एका माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे घटक म्हणून सांगता येणार नाही. त्यांच्यावर बाह्य व्यक्तिमत्त्वासारखा स्पष्ट ठसा नसतो. बाह्य व्यक्तिमत्त्व म्हणजे आवेग आणि वासना यांचा गुंतवळा असतो. शरीराच्या नैसर्गिक कार्यातील सहकार्याने युक्त अशी ती तात्पुरती एकता असते. आणि म्हणून शारीरिक कार्य थांबल्यावर ती एकता संपुष्टात येते. याउलट आस्तित्वाच्या निरनिराळ्या भागांना मानसिक शिस्त लावली असेल तर खरे व्यक्तिमत्त्व निर्माण होते. अशा व्यक्तित्वात पार्थिव जीवनाची स्मृती कायम राहते. आणि म्हणून ते व्यक्तित्व मरण्यानंतरही टिकून राहू शकतं. कलावंत, तंत्रज्ञ आणि इतर काही विकसित व्यक्ती यांनी आपले प्राणतत्त्व सुसंघटित व्यक्तित्वपूर्ण आणि कांही मर्यादेपर्यंत परिवर्तित केलेले असते. ते मरणोत्तर टिकून राहू शकते. या विवेचनाचा स्पष्ट आधार म्हणजे प्रस्तुत कथेचा नायक नचिकेत. मृत्युच्या साम्राज्यात पोहोचल्यावरही आपले भौतिक व्यक्तिमत्त्व त्याने कायम राखले होते. आणि म्हणून नचिकेत हा एक विशेष मानव होता, सर्वसामान्यांची त्याच्याशी तुलना करता येणार नाही.

यानंतर दुसरा मुद्दा असा की उपनिषदांनी म्हटल्याप्रमाणे सर्वश्रेष्ठ चिरंतन तत्व हे असं एकमेव तत्त्व

आहे की ज्यामध्ये कोणताही बदल होत नाही, ज्यावर कसलाही परिणाम होत नाही, जे उत्क्रान्त पावत नाही ते सोडून विश्वातील इतर सर्व काही बदलत असतं. इतरांच अमरत्वही त्या चिरंतनासारखं "Absolute" नसतं. स्वर्गीय देवांना आपण अमर मानतो पण ते त्यांच अमरत्वही त्या चिरंतनापासून प्राप्त झालेलं असतं आणि तेही त्यांच्या वैश्विक स्थानामुळे. कपाली शास्त्री म्हणतात की नचिकेत ही एक खास वैशिष्टयपूर्ण अशी व्यक्ती आहे. त्याने अगोदरच स्वर्गीय अमरत्व प्राप्त केलं आहे. आणि म्हणून उपनिषद जर त्या सर्वश्रेष्ठ चिरंतनाच्या अमरत्वाबद्दल बोलत असेल, आणि स्वर्गीय अमरत्व प्राप्त करून घेतल्यावर ते सर्वश्रेष्ठ अमरत्व जाणून घेण्याची नचिकेताची इच्छा असेल, तर असे म्हणावे लागेल की नचिकेताला अपेक्षित असलेले उत्तर मिळाले नाही अथवा ते अशा पध्दतीने दिले गेले की त्यातून मूळ प्रश्नाचा रोख टाळला गेला. कपाली शास्त्री यावर पुढे म्हणतात की, हे उत्तर ऐकून नचिकेत म्हणाला असेल- "Sir, I talk of chalk you talk of cheese"

नचिकेताच्या कथेवरील भाष्याचा शेवट करताना कपाली शास्त्री म्हणतात की नचिकेताला पहिल्या वरात जीवनाच्या बंधातून मुक्तता मिळाली. म्हणजेच व्यक्त आणि अव्यक्त जगाच्या व्यापारावर प्रकृतीचं जे नियंत्रण असतं त्यापासून त्याला स्वातंत्र्य मिळालं. पण तरीही हे स्वातंत्र्य पूर्ण नव्हतं आणि म्हणून दुसऱ्या वराने तो स्वर्गीय अग्नीचे ज्ञान प्राप्त करतो. हा स्वर्गीय अग्नी वैश्विक अस्तित्वाचा पाया आहे. त्याचा अंश मानवी शरीरातही दडलेला आहे. हे ज्ञान प्राप्त केल्याने आत्मा वरच्या स्तरावर जातो. त्याच्या ज्ञानकक्षा रुंदावतात. मानवाला अनुपम शांतीचा प्रत्यय येतो. परंतु एवढे ज्ञान प्राप्त करूनही नचिकेताचे समाधान झाले नाही, कारण हा स्वर्गीय अग्नी ज्याच्यामुळे निर्माण होतो त्या सर्वश्रेष्ठाबद्दल, चिरंतनाबद्दल ज्ञान प्राप्त करण्याची त्याला उत्कंठा होती.

कपाली शास्त्री म्हणतात की उपनिषदांत सांगितल्याप्रमाणे शरीर नष्ट होण्यापूर्वी हे ज्ञान प्राप्त करणे मानवाला शक्य आहे. हे ज्ञान प्राप्त केल्याने दुसरा जन्म घेणे, प्रगटीकरण साधणे हे त्याला शक्य आहे. हे उपनिषद साधना करण्याचा संदेश देते. साधना करून मानव उच्चकोटीला पोहोचू शकतो. नचिकेताप्रमाणे दृढ श्रध्देच्या जोरावर कठोर साधना करून देवांनाही दुर्लभ अशी स्थिती प्राप्त करणे मानवाला शक्य आहे आणि मानवाने ते करावे हाच या उपनिषदाचा संदेश आहे. अशा रीतीने कपाली शास्त्रींनी उपनिषदातील निरनिराळ्या ६ विद्यांवर भाष्य लिहून त्यांतील कांही गूढ भागावर प्रकाश टाकला. परंतु कपाली शास्त्री हे हाडाचे तांत्रिक होते. वेदवाङ्मयाप्रमाणे तंत्रविधेलाही गौण मानले गेले, झिडकारले गेले याचा त्यांच्या मनांत खेद होता. "Sidelights on Tantra" हा ग्रंथ लिहुन त्यांनी वेद आणि तंत्र यांचा संबंध दाखवला. याशिवाय गणपतीमुनींनी लिहिलेल्या रमणगीता, सत्दर्शनम्, आणि उमासहस्त्रम् या रचनावंर भाषे लिहिली. वसिष्ठवैभवम् या नावाने गणपतीमुनींचे संस्कृतमध्ये चरित्र लिहिले. अशा तऱ्हेने वेदवाङ्मयास प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे योगी अरविंदांनी सुरू केलेले कार्य त्यांनी श्रध्देने आणि निष्ठेने पार पाडले.

संदर्भ - १) Varsalite Genius
२) Lights on upanishads
३) संजीवन

श्री. नरेन्द्र नाडकर्णी
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

# ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ठाणे २०१०

*नुकत्याच झालेल्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर साहित्य व संस्कृतीच्या संदर्भातील हा लेख - संपादक*



### नाते साहित्य व संस्कृतीचे

साहित्य व संस्कृती ह्यांचे नाते गूढ स्वरुपाचे आहे. हे कोडे उलगडण्याचे प्रयत्न जगभर चालूच आहेत. हा शोध ललित आणि शास्त्रीय वाङमयातून घेतला जातो आहे. जीवनाचे तत्वज्ञान, राजकीय व सामाजिक चळवळी व लढे, जगातील पुरातन व आधुनिक मानवी संस्कृतींचा अभ्यास, कला व विज्ञान शास्त्राचा अभ्यास, मानवी भाषेचा उगम, अभिवृद्धी व जगातील अनेक राष्ट्रांत विभागलेल्या भूभागांवरील मानवी समाजाच्या भाषेच्या, संस्कृत्यांच्या वैविध्यातूनसुद्धा अभ्यास चालू आहे.

### पृथ्वीवरील मानव व समाज

एव्हढे नव्हे तर खुद्द मानवाचा पृथ्वीवरील अस्तित्वाचा जन्म त्यानंतर किंवा तत्काल बनणाऱ्या सामाजिक गट संगठनाचे अस्तित्व व ह्यांचा, परस्पर प्रभावाने घडणारा उद्धार ह्याचाही अभ्यास चालू आहे.

सृष्टिनिर्मित पर्यावरणात जगणाऱ्या ह्या मानवी समाजाच्या उत्क्रांतितत्त्वांच्या रोखाने होणारा प्रवाससुद्धा अभ्यासात आहे. मानवी प्रयत्नांनी निर्माण झालेल्या तांत्रिक शोधांनी होणाऱ्या क्रांतीच्या प्रभावाचा संस्कृतीत होणारा बदलही अभ्यासात आहे.

### उत्क्रांतीचा राजमार्ग

इतकेच नव्हे तर हे सांस्कृतीक बदल एखाद्या नैसर्गिक सृष्टि निर्मितीच्याच 'आराखड्याचाच' अनाकालनीय भाग आहे का, असाही शोध चालू आहे.

ह्या संबधात अनेक धर्म, आध्यात्मिक तत्वज्ञान व साधना ह्यांचा ज्ञात व अज्ञात प्रभाव हा सांस्कृतिक बदलाचा भाग आहे का, असाही सवाल आहे!!

### संस्कृतीचे प्रश्नोपनिष्द

ह्या व अशा अनेक उद्योगांत मग्न असलेल्या मानवी समाजाला स्वाभाविकपणे अनेक प्रश्न पडले आहेत व ते अजूनही अनुत्तरित आहेत.

प्रथम भाषा म्हणजे काय? फक्त भौतिक सृष्टितील जीवांची की अज्ञात विश्वातील अस्तित्वातील जीवनाची? संस्कृती म्हणजे नक्की काय? कुठल्याही संस्कृतीचा एखादा प्रवाह वा स्त्रोत हा युगायुगांत आणि पिढ्या न् पिढ्या अशा मर्त्य मानवी जीवनांत कुठल्या शाश्वत सत्य धारणा व नियमांवर चालतो? स्वतःचे वैशिष्ट्य कसे निर्माण करतो व टिकवतो? या सांस्कृतिक प्रवाहाचे अंतिम उद्दिष्ट कोणते? त्याने मानवी जीवन सुसंस्कृत होते हा दावा खरा आहे काय व तो असल्यास हा उद्धार कोणाचा, व्यक्तीचा की समाजाचा का जगाचा अथवा संबंध विश्वाचा?

याची उत्तरे मिळाली नाहीत; पण प्रयत्न चालू आहेत.

### शोध संमेलनातून

तेव्हा ह्या मानवी प्रश्नांच्या उत्तराच्या शोधाकरिता युगानुयुगे व्यक्तिगत व सामूहिक प्रयत्न होत आहेत. त्या

सार्वजनिक शोध प्रयत्नांचा एक आविष्कार लोकप्रिय 'संमेलने' हा असू शकेल!!

**मराठी प्रयत्न**

अशाच प्रयत्नांचा एक छोटासा प्रयोग हा **अखिल भारतीय, 'मराठी संमेलानाच्या' १८७८** सालापासूनच्या पहिल्या वहिल्या संमेलनापासून सुरु झाला असे म्हणावेसे वाटते. कारण, **न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे** यांच्यासारख्या अध्यक्षांच्या हस्ते या प्रयोगाचा आरंभ झाला. **पुणे शहराला हा मान मिळाला.**

**अहवाल : विचारांचा शोधांचा**

या जवळजवळ १३२ वर्षे चाललेल्या 'मराठी' संमेलनाधिष्ठित प्रयत्नांचा अहवाल काय आहे? ह्याचा थोडसा अंदाज त्या संमेलनाच्या व्यासपीठावरुन संमेलनाध्यक्ष विव्दानांच्या भाषणातून घेता येण्यासारखा आहे.

पहिल्या टप्प्यांत मराठी भाषेत साहित्य प्रदर्शित होण्यातील अडचणींचा विचार झाला. दुसऱ्या टप्प्यांत ह्या अडचणींवर मात करण्यासाठी राजाश्रय मिळवणे व लाभणे आवश्यक बनले. त्यामुळे स्वाभाविकपणे ही संमेलने भारतीय संस्थानिकांच्या राज्यात झाली. ब्रिटिश इंडियात नव्हे!! सन १९१७ साली इंदूरला झालेल्या साहित्य संमेलानाचे अध्यक्ष गणेश जनार्दन आगाशे ह्यांनी बडोद्याच्या 'श्रीमन्महाराज' सयाजीराव गायकवाड व इंदोरच्या 'श्रीमन्महाराज' सवाई तुकोजीराव महाराज ह्यांच्या उदारतेबद्दल स्वतःच्या हदयातून उत्साफूर्त कृतज्ञता पूर्वक उद्गार काढले, एव्हढेच नव्हे तर एक सामाजिक तत्त्वही सांगून टाकले. कोणते ते तत्त्व? राजशेखर कवीच्या काव्यमींमांसा ह्या संस्कृत भाषेतील ग्रंथातील एक वचन उद्धृत केले.

''राजा कविः कविसमाजं निद्यति।

राजनि कवौ सर्वो लोकः कविः स्यात''

कविता शक्ती सर्वांचेच वाट्यास आलेली नाही हे खरे पण, राजे स्वतः ज्ञानसंपन्न आणि विद्याभिलाषी असले तर जनतेलाही तेच वळण लागते.'' म्हणूनच,

''यथा राजा तथा प्रजा''

ह्याच भाषणांत त्यांनी 'तिसऱ्या टप्प्याचे' उद्घाटन केले. त्यांनी 'काव्य' हा साहित्याचा प्रमुख प्रकार कल्पून त्याची आठवण करून दिली. इंदूरच्या जवळच भारतवर्षातील अत्यंत प्राचीन काळात भोजराजाची सुप्रसिद्ध राजधानी उज्जयिनी येथे 'काव्यपरीक्षा' होत असे व 'शास्त्रपरीक्षा' सुद्धा होत असे. हे सांगून 'काव्याचा आत्मा जो रस तो ओळखण्याची युक्ती सांगणाऱ्या एक लेखिका विजया ह्या कर्नाटकांतील कवयित्रीची वाखाणणी केली.

पण, वाङमय व साहित्य यांच्या शास्त्रीय भूमिकांचा उल्लेख करताना त्यांनी अभावितपणे सांस्कृतिक प्रवाहातील ४ थ्या टप्प्याचाही उल्लेख केला.

**शब्दांतील चेतना व पुण्याई**

ते म्हणाले की न्यायमूर्ती रानडे ह्यांच्याशी गप्पा मारताना 'श्री ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या पालख्यांचा विषय निघाला. तेव्हा न्या. रानडे म्हणाले - ''पालख्यांचे हे जे हजारो वारकरी उन्हातान्हात, पाऊसपाणी, उपासतापास इत्यादी हालअपेष्टा भोगीत पंढरीस जातात ते उगीच जात नाहीत. श्री ज्ञानेश्वर आणि तुकोबाराय बोलले आणि हे वारकरी मंडळ हालले, त्यांना स्फुरण आले आणि तुम्ही आम्ही बोललो, व्याख्याने देतो पण आपले कोणी ऐकतो काय? पाच - पावशे वर्षे होऊन गेली तरी त्या साधुंच्या शब्दांतील चेतना करण्याचे सामर्थ्य होते तसेच आहे! याचेच नाव पुण्याई''

**भाषाभिवृद्धी नैसर्गिक वा कृत्रिम**

तेव्हा संमेलनांचा उद्देश 'भाषाभिवृद्धी' हा शोध

लावून बडोदे व इंदूर ह्या अधिवेशनातून त्याला राजाश्रय व राजाची वैयक्तिक सांस्कृतिक क्षमता हा एक आधार मानला गेला. असे दिसते.

पण, समाजाच्या जीवनधारणेत व आत्म्याच्या अव्यक्त आकांक्षा यामध्ये धडपडणाऱ्या समाजात व त्यातील साक्षात्कारी संतांकडून उच्च श्रेणीची साहित्यनिर्मिती होते असे न्या. रानड्यांच्या ध्यानात आले असे दिसले. **सन १९२९ साली बेळगांव** येथे भरलेल्या संमेलनाचे अध्यक्ष काळकर्ते **शि.म. परांजपे** होते. त्यांनी भाषाभिवृद्धी हाच जर संमेलनाचा मुख्य हेतू असेल तर ती अभिवृद्धी 'दोन प्रकारची होत असते' असे प्रतिपादले. एक प्रकार म्हणजे **नैसर्गिक** व दुसरा **कृत्रिम.**

भाषेची वाढ ही निसर्गाच्या नियमांप्रमाणेच आपोआपच होत असते. "**देवीं वाचमजनयन्त देवा: ।।**" या मंत्रात म्हटल्याप्रमाणे परमेश्वराने **वाचाशक्ती** निर्माण करून दिल्यापासून स्थलकालादिकांच्या भेदानुसार निरनिराळे लोक आपआपले लौकिक व्यवहार साध्य करतात. कृत्रिम प्रकार ह्या धडपडीतून निर्माण होतो.

पण, **वाग्देवतेच्या प्रसादाने** निर्माण होणाऱ्या वाङ्मयाचे कर्तव्यक्षेत्र याच्यापेक्षा किती तरी **विस्तृत, विशुद्ध आणि वैदग्धयुक्त** असे आहे. तेव्हा शि.म. परांजपे यांनी साहित्यनिर्मिती ह्या संकल्पनेतील आणखी एक पांचव्या टप्प्याचा शोध लावला. समाजाच्या व्यवहाराला लागणारी भाषा ही नैसर्गिक शक्तीच्या प्रभावाखाली आपोआप होत असते तर अदृश्य वैश्विक शक्ति म्हणजे वाचाशक्तीची शक्ती तिला एक देवता म्हणूया! त्या वाक्देवतेच्या "प्रसादाने" होणारी वाङ्मय, साहित्य निर्मिती ही श्रेष्ठ होय असा निर्वाळा दिला.

एक लक्षात येईल की या **श्रेष्ठ साहित्याची निर्मीती** कशी होते. त्याचा **पूर्णशोध लागला नाही,** पण त्याच्या बाह्यात्कारी स्वरूपाची वर्णने करण्यात व तेवढ्यापुरतेच विव्दान यशस्वी झालेले दिसतात. म्हणजेच वाङ्मयाचे **बाह्यात्कारी स्वरूप दिसले,** अनुभवले पण त्याच्या **अंतरंगाचा शोध झाला नाही–** किंवा त्याचे शास्त्र समजले नाही.

**सृजनशक्तीचा शोध**

**त्यामुळे या अगम्य प्रक्रियेचा शोध पुढे कोणी घेतला या एका उद्देशानेच आपण हा संमेलनाचा इतिहास तपासू या.**

या शोधासाठी आपल्याला १९२१ साली बडोद्याला झालेल्या **साहित्यसम्राट न. चिं. केळकर** यांच्या व्याख्यानाकडे जावे लागेल.

**सविकल्प समाधी**

**श्री. रा. प्र. कानिटकरांच्या** शब्दात, "केळकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात '**सविकल्प समाधीचा** एक नवीनच सिद्धान्त मांडला. ते आपल्या भाषणांत म्हणाले, "एखाद्या उपमेने आपल्याला आनंद होतो त्याचे कारण हेच कीं, सद्गुण अशा दोन पदार्थांचा अनुभव मनाला एकदम घेता येतो. व हीच गोष्ट समगुण अशा जितक्या अधिक पदार्थांविषयी एकदम घडेल तितका तो आनंद वाढेल. ह्या आनंदाने एक प्रकारची तल्लीनता येते व तो आनंद फारच उत्कट झाला तर त्यापासून समाधीही लागू शकेल. या दृष्टीने पहाता, 'खरी सविकल्प समाधी उत्पन्न करू शकते ते वाङ्मय' अशी नवीन व्याख्या मी बनवली आहे"

पुढे केळकर सविकल्प व निर्विकल्प समाधीतील फरक विशद करून सांगतात, की सविकल्प सामाधीत म्हणजे वाङ्मय सेवनाने निर्माण होणाऱ्या समाधीत स्वत:च्या मनोभूमिकेची जाणीव तर उरतेच, पण (वर दर्शविलेल्या रीतीने) इतर भूमिकाही तीत समाविष्ट होऊ शकतात.

. . . या दृष्टीने पहाता सुंदर कल्पनाकल्लोळ ही

वाङ्मयप्रेमी मनुष्याला इष्टापत्तीच होय.'' त्यानंतर आपण **१९५४ साली दिल्ली** येथे भरलेल्या साहित्य संमेलनातील **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** यांचा व्याख्यानाकडे जाऊ या. त्यांनी सुरुवातीला **जॉन डयूयी व अर्नेस्ट कॅसियर** यांच्या विचारांचा मागोवा घेऊन आपला निष्कर्ष सांगितला.

''साहित्य किंवा ललितकला मानवी संस्कृतीचाच आविष्कार असतो. विद्या व व्यावहारिक अनुभव आत्मसात केल्यावरच संस्कृतिसाहित्याच्या व कलेच्या कळ्या धरते

''संस्कृतीच्या मीमांसेची आणि कलेच्या मीमांसेची मौलिक गृहीत कृत्ये वा तत्त्वे एकच आहेत. स्वतंत्र सर्जनशीलता हे मानवी संस्कृतीचे पहिले गृहीत कृत्य होय. स्वत:ला आणि भोवतालच्या विश्वाला बदलण्याची आंतरिक गरज सर्जनशीलता निर्मिते. **स्वत:ला व निसर्गाला बदलल्याशिवाय मानवी आस्तित्व टिकाव धरूच शकत नाही.''**

पुढे शास्त्रीबुवा 'ईश्वरसृष्ट' व मानवनिर्मित बदलांतील फरक विशद करतात.

'नैसर्गिक स्वरुपातले '**ईश्वरसृष्ट** विश्व माणसाच्या उपयोगाचे नाही. त्याकरिता माणसास त्याच्यावर संस्कार करून ते सुधारावे लागते. 'ईश्वरसृष्ट विश्वाला मानसिक व भौतिक आकार दिल्याशिवाय ते भोगता येत नाही. **देवाने दिलेला देह किंवा निसर्ग सुधारण्याची क्रिया म्हणजे 'संस्कृती निर्मिती'**

''या जगातील न्यूनतेचा परिहार करणे व त्याला आधिक उदात्त रूप देणे हा **संस्कृतीची प्रक्रिया** होय.'' शास्त्रीबुवांच्या ह्या मीमांसेत त्यांनी ईश्वरसृष्ट बदल व 'मानवीसृष्ट बदल' म्हणू या, ह्यांतील फरकांमध्ये, मानवावर 'Exclusive' म्हणजे 'स्वतंत्र्य जबाबदारी टाकली. ईश्वरसृष्ट प्रक्रियेत न्यूनता दिसते, त्याचा परिहार 'फक्त मानवच स्वत:च्या स्वतंत्र, प्रतिभेने करून नवीन संस्कार प्रक्रिया चालू करतो असा निष्कर्ष काढला.

या निष्कर्षाचे कारण उघड आहे. **पाश्चात्त्य विज्ञानवादी भौतिकवादी व निरीश्वरवादी वैचारिक क्रांतीचा** प्रभाव भारताच्या विद्वानांवर जबरदस्त पडला होता. त्यांचे समाजावरील सांस्कृतिक बौद्धिक खच्चीकरण मेकॉले साहेबाने सुरू केले, त्यामुळे भारताच्या संस्कृतीच्या मूळ बीजस्वरूपाचे सामाजिक विस्मरण झाले होते. त्यांत भर म्हणजे **भारतीय वैदिक संस्कृतीचे दर्शनी स्वरुप एका एकांगी संसार-विन्मुख संन्यासमार्गी, निवृत्तीमार्गी अध्यात्मशास्त्रात** 'विकृत' झाले होते व त्या स्वरूपालाच हिंदू धर्म व अध्यात्म असे चुकीचे संबोधून भारतीय संस्कृतीच्या मूळ बैठकीलाच विकृत करण्यांत आले होते. त्यामुळे संस्कृतीच्या बदलाची 'Integral' 'सर्वसमन्वयी' पद्धत कमी लेखून मानवी एकांगी प्रयत्नांनाच नेतृत्व व श्रेय देण्यात आले. वैदिक संस्कृती व सनातन धर्म हा स्पिरीच्युअल सायन्स असूनही तो केवळ Faith विश्वास आणि मूर्तिपूजा आहे असा समज दृढ झाला होता.

## उलटा ज्ञानमार्ग

त्याचा उघड परिणाम त्यानंतर किंवा त्या सुमारातील काळात सामाजिक चळवळी व साहित्यकांच्या विचारांवरही पडलेला दिसतो. भौतिकवादी व Reductionist सृष्टीक्रमाच्या उलट म्हणजे From parts to whole ''अवयवाकडून सर्वांगाकडे'' अशी ज्ञानशास्त्राची धारणा असलेले पाश्चात्य विज्ञानाच्या प्रभावाने दिपून गेलेले विद्वान आपल्या संस्कृतीचे श्रेष्ठत्व व सामर्थ्य विसरून गेले होते.

## ''दिशा'' विद्या प्रसारक मंडळ ठाणे

या अनुषंगाने वा संदर्भाने मी विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' ह्या मासिकात इ.स. २००५ पासून प्रत्येक महिन्याला एक लेख अशी लेखमाला लिहिली आहे. शीर्षक 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना 'त्यात विस्तृत विवेचन केले आहे. तिकडे लक्ष वेधू इच्छितो.

पण ह्या लेखाच्या संदर्भात असे म्हणावेसे वाटते की मराठी संमेलनांत ह्या भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठ आध्यात्मिक स्वरूपाचा नुसताच विभ्रम पडला असे नसून त्यांतील सत्यान्वेषी व वैश्विक सांस्कृतिक प्रवाहाचा बोधच नाहीसा झाला.

**Science & Marxism & Social Movements**

विज्ञानवाद व मार्क्सवाद ह्या दोन विचार प्रवाहांचा प्रभाव नंतरच्या सर्व अध्यक्षांच्यावर पडलेला दिसतो. आचार्य जावडेकर हे १९४९ साली पुण्याच्या संमेलनाचे अध्यक्ष झाले. त्यांनी एका नव्या 'मानवी संस्कृतीची' घोषणा केली. पण तत्पूर्वी त्यांनी या मोठ्या सांस्कृतिक बदलाचा विस्तृतपणे मागोवा घेतला.

आचार्य जावडेकरांच्या मानवी संस्कृतीचा उहापोह त्यांच्या 'समाजवाद आणि सर्वोदय' ह्या प्रसिध्द पुस्तकांत सापडेल.

ते लिहितात, जीवनमूल्यांना जेव्हां प्रस्थापित समाजघटनेत अवसर उरलेला नसतो, तेव्हा त्यांच्या संस्थापनेसाठी सामाजिक क्रांती करण्यासाठी सनातन धर्मांच्या जीवनमूल्ये रक्षणासाठी ती प्रवृत्त होतो.

सामाजिक व राजकीय क्रांतीचे काम ही एक सर्वोदयी समाजघटना व मानव संस्कृती यांच्या निर्मितीलाच कारणीभूत होते.

महाराष्ट्रात आध्यात्मिक जीवननिष्ठेचा आधार हा आद्य शंकराचार्यांच्या 'अद्वैत तत्वज्ञानावर आधारलेला होता. पण प्रत्यक्षात, सर्वसामान्य हिंदूंची धारणा आध्यात्मिक संत परंपरेच्या भक्तिमार्गावर अधिष्ठित होती व आजही आहे.

सामाजिक स्थित्यंतरांत मार्क्स प्रेरित विरोध - विकासवाद व भांडवलदार वर्ग व कामगारवर्ग यामधील आर्थिक व सामाजिक पिळवणुकीच्या निर्दालनाची चळवळ मूळ धरू लागली होती. पण हा नवीन विचार प्रवाह फक्त राजकीय जातीचा न राहता त्याचा शिरकाव सामाजिक संस्कृती व साहित्य यावर सुद्धा झाला

त्याचे एक उदाहरण - केशवसुतांच्या कवितेत देता येईल

''अडवतील जर देव तरी
झगडू त्यांच्याशी निकरी,
हार न खाऊ रतीभरी
किंवा ह्या पुढे जाऊन -
देव दानवा नरे निर्मिले! हे मत लोका कळवू द्या''
''पूजितसे मी कवणाला? तर मी पूजी अपणाला''
आपणामध्ये विश्व पाहूनी पूजी मी विश्वाला ॥

संमेलन अध्यक्षांची जबाबदारी

आचार्य शंकर दतात्रेय जावडेकर, ह्या राजकीय, आर्थिक, सामाजिक वैचारिक क्रांतीचा इतिहास का सांगतात? ह्याचे गृहीत तत्त्व हेंच दिसते की साहित्य संमेलनाच्या अध्यक्षावर समाजाला संस्कृती व साहित्य ह्या विषयावर मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आहे. ही जबाबदारी साहित्यावर व संस्कृतीवर सहजच राजकीय, आर्थिक व सामाजिक तत्वज्ञानांचा प्रभाव पडत असतो. तो जाणून घेणे हे महत्वाचे आहे.

का महत्वाचे आहे?


ह्याचे कारण हेच की जर भौतिकवादी ह्या सगळ्या बदलाच्या प्रेरणा नैसर्गिक किंवा 'ईश्वरी' मानत नसतील तर त्या पूर्णपणे मानव निर्मित मानाव्या लागतील. मग संस्कृतीचा प्रवाह जर मूल्याधिष्ठित हवा असेल तर त्याची संपूर्ण जबाबदारी मानवालाच घ्यावी लागेल.

नित्शे ह्या जर्मन फिलॉसॉफरच्या मते "God is dead" हे वाक्य त्याच्या साहित्यकृतीतून प्रसवले!! हे जर सत्य असेल किंवा अलीकडे डॉ. श्रीराम लागू म्हणाले तसे जर 'परमेश्वराला रिटायर करण्यात आले असेल' तर सगळ्या चांगल्या जुन्या सांस्कृतिक मूल्यनिर्मितीची संपूर्ण जबाबदारी साहित्य व संस्कृती ह्या विचारधरांवर येऊन पडते.

लेखकाच्या लेखन व विचार स्वातंत्र्याबद्दल बहुतेकांचे एकमत आहे. पण १९७४ साली पु. ल. देशपांडे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते की ''नव्या युगातल्या नव्या अनुभूतीचे दर्शन हे सौंदर्यासंबधीच्या, नीतीविषयीच्या वगैरे जुन्या रूढ कल्पनांशी कधीकधी जुळणारे नसेलही; म्हणून लेखक जर दुरितांचे तिमीर जावो ह्या भावनेने त्याला जाणवलेले सत्य कलापूर्ण स्वरूपात मांडत असेल, तर 'जो जे वांछील तो ते लाहो' ''यांप्रमाणे जो जे वांछील तो ते लिहो'' अशी आपली धारणा पाहिजे '' पुढे ते म्हणतात:- ''माणसाच्या सुकृती इतकीच माणसाची विकृती हेही एक सत्य आहे. अशा विकृतीची चित्रे साहित्यात आता ह्या विज्ञानयुगात येणे अपरिहार्य आहे.

वैज्ञानिक बुद्धीला आपल्या चुका कबूल करावयाला संकोच वाटत नाही ..... जो जे वांछील तो ते लिहो, या मागे जीवन अधिक सुंदर करण्याची, दुरितांचे तिमिर घालवण्याची भावना नसेल तर कलानिर्मितीच्या मुख्य प्रेरणेशीच ती प्रतारणा होईल, म्हणून इथे लेखक आणि वाचक ह्या दोघांनाही आपली जबाबदारी कळावयाला हवी.''

दुर्गा भागवत ह्या १९७५ साली झालेल्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्ष होत्या. त्यांनी एका नवीनच संकटाची घंटा वाजवली. ती होती 'इमर्जन्सी'. तिचे स्वरूप राजकीय होते, मग साहित्य व संस्कृतीशी काय संबध आला? दुर्गा भागवत म्हणाल्या -



सरकारी आणीबाणीमुळे लेखकाच्या विचारस्वातंत्र्यावर व लेखनस्वातंत्र्यावर जी बंधने आली तिचा त्यांनी आपल्या भाषणांत निषेध केला व प्रत्येक लेखकाने आपले स्वातंत्र्य गमावता कामा नये असे साहित्यिकांना आवाहन केले. ब्रिटिश अमदानीतील स्वातंत्र्य व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे लेखन स्वातंत्र्यावर त्यांनी तुलनात्मक विचार मांडले ''ऐंशी वर्षापूर्वी राजवाड्यांनी मांडलेले विचार आजही ताजे वाटतात. त्याचे कारण समाजप्रवाहांशी ओळख त्यांना स्वत:च्या अनुभवानीच झाली होती. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यानंतरची परिस्थिती पडताळून पहाताना आपल्याला असे आढळून येते की, पारतंत्र्याच्या त्या काळात लेखकाला जेव्हढी प्रतिष्ठा होती, तेव्हढी नंतर राहिली नाही. सुरक्षिततेचा आभास निर्माण झाला पैसा जास्त मिळतो, सरकार दरबारी मानाची स्थाने, पारितोषिके मिळतात, किताबही मिळतात. पण वैचारिक क्षेत्रात, जनमानसात लेखकांना अधिकारत्व राहिलेले नाही. कारण या परिस्थितीत स्वत्वाची कसोटी लेखकाला स्वत:लाच आवश्यक वाटत नाही.

जनता संपर्काची साधने -रेडिओ, टीव्ही व इतर माध्यमांचा वापर करताना लेखकांनी स्वत:ची मूळ पातळी मात्र गमावली आहे.

ज्या यंत्रणेत सुधारणा घडविण्यासाठी प्रारंभी हे सज्ज होते तिचेच ते दास झाले.

या प्रवाहात आणखी एक जोरदार प्रवाह आला तो कुठल्याना कुठल्या 'सामाजिक बांधिलकीचा' वैचारिक

स्वातंत्रच्या मुख्य स्वरुपांत येउन तो आता बांधिलकीच्या दो-या घट्टपणे बांधू लागला. लेखन एका सत्‌चित आनंद ह्या वैश्विक सत्यापासून व कलेच्या सौंदर्य व प्रतिभा ह्या तत्त्वांपासून फारकत किंवा तात्पुरता तलाक घेउन साहित्यिक एकांगी भौतिकवादाची मागणी, म्हणजे समाज सुधारणेची व तिच्या उद्दिष्टांशी स्वत:ला जखडून टाकू लागले. हा प्रवाह आवश्यकच होता, पण त्याचा साहित्य व संस्कृतीतील प्रभाव प्रमुखत: राजकीय स्वरूपाचा व राजकीय अधिकाराचा लढा असा झाला त्याचे स्वतंत्र साहित्यिकी दालन हे मूळ प्रवाहाशी संम्मिलित होण्याची प्रक्रिया अजूनही पूर्ण झाली नाही.

एका छोट्याशा लेखन साहित्य, संस्कृती व त्यांच्या चळवळीतून जे मूलभूत सवाल उठतात त्या संदर्भात महायोगी अरविंद यांचा काय विचार आहे हे पहाणे नक्कीच उद्‌बोधक ठरेल असे मला मनोमन वाटते.

**महायोगी श्री. अरविंद व संस्कृतीच्या उत्कान्ती मार्ग**



महायोगी अरविंद यांचा एक विचार महत्वाचा आहे. अन्वयार्थ असा आहे. "सौदर्यांच्या बीजसमीकरणाचा शोध ज्या चिखलातून ते उगवले त्या चिखलाच्या रासायनिक वैज्ञानिक पृथक्करणांत नाही सांपडणार. त्याचे रहस्य आकशात आहे." त्यांच्या 'Integral Yoga' हयाचा सांस्कृतिक विषयाशी काय संबंध आहे ? मानवी संस्कृती हा निसर्ग व मानवी सृजनशक्ती हयांचा संयुक्त प्रवाह आहे. त्यांतील प्रेरणा व शक्ती परसपरावलंबी आहेत. त्यांच्या अनंतकाळ, युगायुगांतून चालणा-या कार्यक्रमाला काही क्रमाक्रमाने उलगडणारी दिशा व ध्येय आहे. त्याचे 'क्षेत्रबीज' "मानवी कॉन्शसनेस, म्हणजे चैतन्यशक्ती हे आहे." हया उत्क्रांतीमार्गाला वैश्विक रचना व हेतू ही आधारभूत आहेत. या संस्कारक्रियांमधून जी जीवनमूल्ये निर्माण होत आहेत, त्यांचे संयुक्त स्वरूप सत्- चित-आनंद या वैश्विक शक्ती स्वरूपांचे आहे. हया प्रवाहात मर्त्य देह प्राप्त असलेल्या मानवी चैतन्यशक्तीला व्यष्टि व समष्टीच्या परस्पर सहकार्याचा विलक्षण आधार आहे. तो ज्या निसर्गाचा व विश्वाच्या रचनेवर विसंबून राहतो त्या रचनेचाही हाच गूढ व अगम्य हेतू व धोरण आहे. हे गूढ जाणण्याचे व उकलण्याचे सामर्थ्य मानवी देहबध्द चैतन्यशक्ती किंवा जीवात्माला जरूर आहे.

त्या प्रयत्नांचा एक आविष्कार साहित्य, वाङमय, कला हयांची निर्मिती व शोध हा मानावा लागेल. या शोधाला मानवातील सुप्त शक्तीच्या प्रकटीकरणाची जोड आहे व त्या अनुषंगाने उकलणा-या तंत्रांचा सहकार होत आहे व होणार आहे.



अरविंदांच्या सत्प्रेम नावांच्या फ्रेंच अनुयायाने पृथ्वीवरील या वैश्विक संकल्पनेला Adventure of Con-

sciousness असे शीर्षक दिले आहे. ते अगदी सार्थ आहे. ह्या मानवी चैतन्यशक्तीच्या सांस्कृतिक पराक्रमांच्या धाडसी प्रयोगात आपण सर्व सामील होउ या !!

श्री. यशवंत रामचंद्र साने
(अध्यक्ष-ठाणे नगरवाचन, मंदिर:टेलि.२५३४५५८६)
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अम्यारी लेन, ठाणे. दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## ''लंडनमधील मला आवडलेली बालवाडी''

मी व सौ. मधुरा कोर्डेबाईंनी 'मोनेगा प्रायमरी स्कूल' या शाळेला भेट दिली. त्या शाळेत संगीतमय कार्यक्रमाने आमचे छान स्वागत केले. भारतीय पद्धतीचा चहा व जेवण आमच्यासाठी केले होते.

त्या साळेचे मुख्याध्यापक श्रीयुत हेनी व तेथील पर्यवेक्षिका श्रीमती लिंझी यांनी हसतमुखाने स्वागत करुन संपूर्ण शाळा दाखवून त्यांच्या शाळेविषयी पुष्कळ माहिती दिली.

त्या शाळेत बालवाडी ते चौथीपर्यंत एकूण विद्यार्थ्यांची संख्या ७०० इतकी आहे. शाळा शासनमान्य असल्याने मुलांना फी किंवा देणगीमूल्य नाही. दररोज मुलांना चांगल्या प्रतीचा खाऊ, खेळ व पुस्तके मोफत असून मुबलक प्रमाणात आहेत. हसत-खेळत शिक्षण दिले जाते. कोणताही विषय संगणकावर हव्या त्या पद्धतीने शिकवला जातो. त्यासाठी तेथे १७ संगणक होते. शाळेच्या सर्व भिंती रंगीबेरंगी विविध चित्रांनी सजवलेल्या होत्या. तेथे गणवेशाच्या रंगाबाबत नियम असून विशिष्ट पद्धतीच्या नमुन्यासाठी मात्र नियम नाही.

एका विषयासाठी ४५ मिनिटे एवढा वेळ आहे. शाळेत सेवक किंवा सेविका नव्हते. तेथे शिक्षक व शिक्षकेतर बरीच कामे स्वखुषीने करतात. दर इयत्तेत परीक्षापद्धती नाही. १ ली परीक्षा वयाच्या ७ व्या वर्षी, २ री परीक्षा वयाच्या ११ व्या वर्षी घेतात.

संगीताच्या वेगळ्या वर्गात अनेक प्रकारची वाद्ये असून मुलांना हाताळण्यासाठी ती दिली जातात.

दर सोमवारी ४ ते ५ वेळात सभा असते. त्या सभेत नियोजनावर चर्चा करतात. शासनाकडून ६ महिन्याचे वेळापत्रक - अभ्यासाचे नियोजन करून सभेत त्यावर चर्चा करतात. प्रवेशासाठी वाशिलेबाजी किंवा प्रवेश परीक्षा नाही.

निवृत्त शिक्षिका स्वयंपाकीण म्हणून काम करीत होत्या. लहान शिशुची वेळ सकाळी ९ ते ११-३० व मोठ्या शिशुची वेळ दुपारी १ ते ४ आहे. बालवाडीला स्वतंत्र मोठे मैदान आहे. वर्गात ४५ मुले होती. त्यांच्यासाठी २ प्रशिक्षित शिक्षिका व २ मदतनीस अशा चार शिक्षिका तेथे होत्या.

बालवाडी व प्राथमिक विभागात कोठेही मुलांना ओरडायचे किंवा मारायचे नाही असा कडक नियम असल्यामुळे, मुलांना धाक नाही. परीक्षा नसल्याने अभ्यासात चढाओढ नाही.

सौ. अंजली पटवर्धन
पूर्व प्राथमिक विभाग
डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे

# स्त्री जीवनात विज्ञान पहाट

*स्त्री शिक्षणाच्या सुरुवातीच्या काळात वैद्यकीय शिक्षण घेऊन समाजसेवा करू पाहणाऱ्या काही स्त्रियांचा या लेखात उल्लेख आहे - संपादक*

मागील अंकातील एके ठिकाणी दिलेल्या आवडाबाईच्या उदाहरणावरून दिसून येते की अपक्व वयात ही विचारांची पक्वता मुलींवर क्रांत होण्यास 'फिमेल हायस्कूल' चा सिंहाचा वाटा होता, हे कदापि विसरता येणार नाही. याच शाळेच्या संस्थेच्या - यशाच्या वाट्यात 'शास्त्र' विषयाशी निगडित अशा विद्यार्थिनी - शिक्षक-शिक्षकिणी यांचे संदर्भातील आधिक उल्लेख - घटना- यांची नोंद आवर्जून घ्यायला हवी...

डॉ. काशीबाई नवरंगे मूळ मुंबईच्या. तरी मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण (१८९६) हुजूरपागेतच झाले. पुढे त्या १९०१ साली विल्सन कॉलेज मधून बी. ए. झाल्या. विशेष म्हणजे 'पदार्थविज्ञान' व 'रसायनशास्त्र' घेऊन ग्रॅज्युएट झालेल्या पहिल्या हिंदू स्त्री होत.

मिस् सोराबजी कारकिर्दीत १९०० ते १९०७ मॅट्रिकला बसलेल्या वीस मुलींत मिस् रिबेका रुबेन (१९०४) सर्व प्रथम येऊन त्यांना ससून हिब्रू स्कॉलरशिप, बाई वैरामजी माणेकजी सायन्स प्राईज तसेच चॅटफिल्ड प्राईज मिळाले! १९०६ साली सायन्स व गणित शिकविणारे शिक्षक असे शिकवीत की धडा पुन्हा वाचावा लागत नसे. ते वर्गाला कधी कधी प्रयोग दाखविण्याकरिता सायन्स कॉलेजमध्ये नेत असत!

१९१५ पासून शिक्षणाचे माध्यम मराठी झाले. त्यामुळे मुलींना विषय सोपे वाटून थोड्या वेळात पुष्कळ अभ्यास होऊ लागला. त्याच सालापासून सायन्स विषय इंग्रजी पहिली पासून शिकविण्यात येऊ लागला. शास्त्रीय प्रयोग मुली स्वत:करू लागल्याने तो विषय मुलींचा आवडीचा झाला. मिस् बर्न आधिक आवड उत्पन्न व्हावी म्हणून बोटॅनिकल गार्डन, पर्वती, काच कारखाना, मुंढव्याची कागद गिरणी, मांजरी येथील फार्म इ. शैक्षणिक दृष्टीने उपयुक्त स्थळांस मुलींना पहावयास पाठवीत.

मिस् फिल्डिंग कारकिर्दीत हायस्कूलचे निकाल सर्वोत्कृष्ट झाले. १९२१-२८ गणित, संस्कृत, सायन्स यांत बऱ्याच जणी Distinction संपादन करीत.

सायन्स विषयावरील पुढील उतारा सदर संस्थेच्या कामगिरीवर प्रकाश टाकणारा आहे...

''सायन्स हा विषय वरच्या वर्गातील प्रौढ विद्यार्थ्यांनाच समजावयाचा असा पूर्वी समज रूढ होऊन बसला होता. लहान वयात या विद्यार्थ्यांना तो समजेल वा समजावून देता येईल असे त्यावेळी कोणास वाटतच नसे. त्यामुळे इ. स. १९१५ पर्यंत हा विषय फक्त ७ व्या इयत्तेतच शिकवीत असत आणि तो शिकवितांना जर काही प्रयोग करणे जरूर असेल तर तो शिक्षकानेच केवळ करावयाचा अशी त्यावेळी स्थिती असे. विद्यार्थ्याने प्रयोग करुन पहावा ही कल्पनाही त्यावेळी नसल्याने विद्यार्थ्याला प्रयोग करण्याची संधी मिळत नसे. हे उघड आहे. परंतु पुढे ही स्थिती पालटली...

जी जी नवीन दिसेल ती ती वस्तू हातात घेऊन सूक्ष्म निरीक्षण करणे आणि अशा कित्येक वस्तूंचा संग्रह करणे हा मुलांचा एक स्वाभाविक धर्म होय. त्यांच्या या

स्वभावाला उत्तेजन देऊन त्यास वळण लावले तर शैक्षणिक दृष्ट्या चांगला उपयोग होईल ही कल्पना हळूहळू पुढे आल्याने इ. स. १९१४ - १९१५ पासून हा विषय अगदी खालच्या इयत्तेपासून वरच्या इयत्तेपर्यंत सातही इयत्तांत क्रमवार वाटून देण्यात आला. आणि प्रत्यक्ष पदार्थ नमुने चित्रे, प्रयोग इ. विविध साधनांच्या सहाय्याने सृष्टिनिरीक्षण आरोग्यशास्त्र, पदार्थ विज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र इ. विषय शिकवण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे या विषयाचा रुक्षपणा सहजच नाहीसा होऊन विषय मुलींना आधिक मनोरंजक व चित्ताकर्षक वाटतात व वर सांगितलेल्या साधनांच्या योगाने त्यांच्या मनावर चांगल्या रीतीने ठसतात.

सृष्टिनिरीक्षण हा विषय खालच्या तीन इयत्तांना शिकवितात. वनस्पतीसंबंधी धडा असल्यास त्या वनस्पतीचे नमुने प्रत्येक मुलीजवळ असतात व त्यांच्या सायन्स वहीत त्या ते चिकटवून ठेवितात. निरनिराळ्या वस्तूंचे निरीक्षण व संग्रह मुली करतात. इंग्रजी ४ थी ला 'आरोग्यशास्त्र' शिकवले जाते. पाचवी-सहावीसाठी मुख्यत: पदार्थविज्ञान व 'रसायन' शास्त्र या विषयांचे सप्रयोग शिक्षण देण्यात येते. परंतु आता हे प्रयोग केवळ शिक्षकांनी करावयाचे नसून विद्यार्थ्यांनी दुरुन पहावयाचे नसून, बहुतेक प्रयोग मुली स्वत: करतात व करीत असताना टाचणेही काढतात या प्रयोगांस जे सामान लागते त्यांच्या आकृत्या मुलींकडून काढवून घेण्यात येत असल्यामुळे प्रयोग लक्षात ठेवायला फार मदत होते.

इ.स. १९२७ पर्यंत या गोष्टी तेथे करवून घेण्यात जागेची टंचाई ही एक मोठी अडचण होती. १९२८ मध्ये प्रयोगशाळेसाठी एक नवीन प्रशस्त हॉल बांधण्यात आला. त्यामुळे जोडी - जोडीने अगर व्यक्तिश: एकाचवेळी अनेक मुलींकडून प्रयोग करवून घेण्याची चांगलीच व्यवस्था झाली.

मुलींना शास्त्रीय प्रयोगाचे काम चांगलेसे साधणार नाही आणि त्यांना हा विषय आवडणार नाही, ही शंका दूर होऊन मुलींची जिज्ञासा व उत्साह लक्षात आली.

नित्य व्यवहाराशी शास्त्रीय गोष्टींचा निकट संबंध असतो. हे पदोपदी लक्षात येत गेल्यामुळे हे विषय मुलींना मनापासून आवडतात. त्या स्वत:प्रयोग हौसेने दक्षतेने करतात. प्रयोगास लागणारे साहित्य निवडून घेणे, आपसात वाटणे, प्रयोगाची मांडणी त्यासाठी लागणारी मोजमापे, आकडेमोड बिनचूक करणे व प्रयोग संपल्यावर सर्व वस्तू पुन्हा जागी ठेवणे, प्रयोगाचे टेबल स्वच्छ ठेवणे, इ. काळजीपूर्वक तत्परतेने करताना शिस्त व टापटीप व बिनचूकपणा याचे बहुमोल वळण त्यास लागते.

ज्या मुलींना 'फिजिऑलॉजी' व 'हायजिन' घेऊन मॅट्रिकला बसावयाचे त्यांना हा विषय ६ वी, ७ वी त शिकवण्याची सोय या वर्षापासून केली आहे.

मिस्. एम. जे. बाडिया कारकिर्दीत (१९२९) शाळेच्या मुख्य इमारतीच्या दक्षिण भागावर एक मजला चढवून सोसायटीने सायन्ससाठी एका भव्य प्रयोगशाळेची व एका वर्गाची तजवीज केली. त्या प्रीत्यर्थ सोसायटीस सुमारे १५ हजार रु. खर्च करावे लागले. परंतु कित्येक वर्षेपर्यंत स्वतंत्र प्रयोगशाळेची जरूर भासत होती ती पूर्ण झाल्याबद्दल सर्वांस आनंद वाटला.

प्रस्तुत लेखाचा उद्देश विषयाचा परिचय करुन देणे हा होता. तरी आपल्या भगिनींना 'विज्ञान परिचय' झाला इतकेच नव्हे तर आपआपल्या कर्तबगारीनुसार त्या त्या प्रांतात त्यांनी आधिक ज्ञान - यश-मिळवण्याचे यत्न केले हे स्वच्छपणे दिसून येते.

सर्वांत पहिला व जवळचा मार्ग स्त्रियांनी आचरला तो म्हणजे नर्सिंग, वैद्यकशास्त्राचे ज्ञान मिळविणे...

वैद्यकशास्त्रात डॉ. आनंदीबाई जोशी यांचे नाव नेहमीच अग्रभागी तळपत राहील हे निर्विवाद!

याशिवाय हुजूरपागेच्या नामावलीत या क्षेत्रातील ज्या हुशार व कर्तबगार स्त्रियांनी आपली स्थाने दृढ केली त्यावर एक दृष्टिक्षेप...

द्वारकाबाई कमलाकर (पूर्वाश्रमीच्या केळवकर) या बुद्धिमान असून हुजूरपागेच्या पहिल्या मॅट्रिक होत. (मेरिटमध्ये क्र १९ वा) कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तेव्हाच शिष्यवृत्ती मिळाली. त्या प्रमाणे वैद्यकीय शिक्षणासाठी लेडी डफरिन फंडातून मदत मिळून त्या एल्‌एम् अँड एस्. होऊन उच्च वैद्यकीय ज्ञान मिळविण्यासाठी विलायतेस गेल्या.

स्त्री शिक्षणाने समाज वर आणण्यासाठी मेहनतीने कार्य करणाऱ्या लेडी डॉक्टर बनारस येथे डफरिन हॉस्पीटल वरील मुख्य आधिकारी म्हणून त्या मान्यता पावल्या.

डॉ. कृष्णाबाई केळवकर - डॉ. द्वारकाबाईंच्या भगिनी. बुद्धिमान व गोड स्वभावाच्या. मॅट्रिकमध्ये १० वा क्र. मिळून फर्गसनची विद्यार्थिनी म्हणून यश. मेडिकलकॉलेज मधील कारकीर्द अत्यंत यशस्वी झाली. मेडिकलच्या २ ऱ्या व ३ऱ्या वर्षात परीक्षांमध्ये पहिला वर्ग मिळून एल् एम् अँड एस् मध्ये यश व अनेक बक्षिसे, पदके मिळविली. १९२० मध्ये स्व खर्चाने विलायतेस गेल्या. कोल्हापूर संस्थानात डॉ. म्हणून २४ वर्षे कार्यरत होत्या. कुशल लेडी डॉ. व समाजसेविका म्हणून सर्वास ज्ञात झाल्या. उत्कृष्ट कामगिरी मुळे 'कैसर-इ-हिंद' पदक प्राप्त झाले.

काशीबाई नवरंगे - पुण्याच्या 'शारदाश्रम' च्या पहिल्या विद्यार्थिनी. अत्यंत हुशार असून १९०५ मध्ये नोकऱ्या मिळूनही स्वीकारल्या नाहीत. वैद्यकीय व्यवसाय उत्तम चालवून सार्वजनिक कामात अधिक रस घेत. त्यांनी 'आर्यभगिनी समाजाची पुनर्घटना केली. कर्तव्यनिष्ठा प्रखर असे.

विविध संस्थांच्या अध्यक्षपदी असूनही गरीब स्त्रिया व मुले यांना स्त्री डॉक्टरकडून औषधोपचार करवीत.

सेवासदन, प्रार्थनासमाज, नायगाव सोशल सेंटर आदी संस्थासाठी अत्यंत उपयुक्त कामे केली. काही काळ जे. पी. म्हणूनही सर्वांत ज्ञात झाल्या. Home for women student ची स्थापना त्यांनी केली. मेडिकल कॉलेजच्या परगावच्या विद्यार्थिनींना उत्कृष्ट सोय पुरवण्याचे, उत्कृष्ट व्यवस्थापन उभारणी त्या करीत यावरुन समाजकार्याची आच कळून येते. त्यांचे औदार्य अनुपम असे. व्यक्ती असो वा संस्था त्या अमूल्य सहाय्य करीत.

बिहारमधील भूकंपग्रस्तांसाठी योजना आखून डॉ. जिराड यांच्या सहाय्याने मुंबईतील स्त्री डॉ. चे पथक घेऊन त्या सेवेस धावून गेल्या. (पथकात डॉ. वसुंधरा वणिकर व डॉ. सावित्रीबाई महाजन होत्या.) काशीबाईंनी बिहारात अतिशय कष्ट घेऊन जी सेवा केली ती लोकोत्तर होय.

मुंबईतील सुप्रसिद्ध डॉ. व आदर्श समाजसेविका म्हणून अभिमानास्पद कामगिरी त्यांचे हातून घडली.

डॉ. जिराड (एम.डी) अप्रतिम बुद्धी. जोडीला गोड स्वभाव. १९०७ मध्ये मॅट्रिकला चॅटफिल्ड, दळवी प्राईज. वैद्यकीय ज्ञानात मुंबईस ग्रँट मेडिकल कॉलेजमधून एल् एम् अँड एस. परीक्षा पहिल्या वर्गात मिळवून अन्य अनेक स्कॉलरशिप्स, मिळाल्या. स्कॉलरशिप ऑफ द मेडिकल विमेन फॉर इंडिया, सर जेम्स फर्गसन स्कॉलरशिप ऑफ द मेडिकल विमेन फॉर इंडिया, लेडि रे सिल्व्हर मेडल, कामा गोल्ड मेडल, इ. बक्षिसे, पदके, शिष्यवृत्त्या मिळाल्या नंतर त्या विलायतेस जाऊन एम. डी. होऊन आल्या.

बंगलोर येथे सर्जन म्हणून काही वर्षे काम झाल्यावर मुंबईस कामा हॉस्पिटल मध्ये कार्यरत झाल्या. अतिप्रख्यात स्त्री डॉक्टरांत त्यांची गणना होते. त्या उदार असून गरीबांना मोफत उपचार करीत. आपला व्यवसाय उत्कृष्ट करून समाजकार्यही करीत. विहारात जाण्याची कल्पना मूर्त स्वरूपात त्यांनीच आणली.

आधुनिक सुशिक्षित स्त्रीचे ध्येय कसे असावे या बद्दल त्या सांगतात...

'Every Woman, whether married or single rich or poor, will need to render service of some kind, whether it be in her own home trying to bring up children of her own or out in the world helping others to live better lives and realise the joys and beauties of this earthly existence. Service is our watch word, particularly of us women, for me are here so happy as when serving others.

डॉ. जिराडनी स्वत: आचरणात आणले मग सांगितले. अशा या आदर्श विद्यार्थिनींचा कित्ता हुजूर पागेच्या विद्यार्थिनींपुढे सतत ठेवणे कर्तव्याचे ठरेल.

डॉ. सुंदराबाई किर्तने - दुर्दैवाने अकाली वैधव्य आले. मॅट्रिकपर्यंत शिक्षण घरच्या प्रोत्साहनाने हुजूरपागेत झाले. पुढे वैद्यकीय शास्त्राच्या अभ्यासासाठी मुंबई मेडिकल कॉलेजमध्ये गेल्या. एल् एम् अँड एस्. संपादन करुन पुण्यास प्रॅक्टीस सुरु. पुण्यातील जुन्या अनुभवी डॉ. त गणना डॉक्टरकी बरोबर सामाजिक गोष्टींत लक्ष बहुतेक स्त्री शिक्षण संस्थांशी निकटचा संबंध हुजूरपागेतल्या मुलींना First Aid शिक्षण देण्यात त्या पुढाकार. त्यावरून त्यांचे शाळेवरचे प्रेम दिसून येते.

यमुनाबाई जोशी नर्सिंग शिकल्या डॉ. सुलोचना श्रीखंडे - बॅक्टिरियालॉजी घेऊन एम् बी बी एस् झाल्या. शांता सातवळेकरही एम्. बी बी एस् झाल्या.

राजूबाई शहा - बी. ए. जी. झाल्या कृषिशास्त्रातील पदवीधर - पहिलीच हिंदू स्त्री होती. सरस्वती फाटक (कृष्णा कानेटकर) बेडफोर्ड कॉलेज पब्लिक हेल्थ अँड नर्सिंग कोर्स करणाऱ्या पहिल्या हिंदू स्त्री. ग्वाल्हेर येथे मॅटरनिटी होमच्या लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून मान्यता पावल्या.

शारदा नायडू - उपरोक्त कोर्स घेऊन मुंबईस भाटियामध्ये कार्यरत झाल्या.

पुण्यात हुजूरपागा संस्था सुरू झाल्यास ५० वर्षे पुरी झाली त्या निमित्त सुवर्णमहोत्सव दिन साजरा होऊन पुणे शहरातील स्त्री शिक्षणास संस्थेचा किती उपयोग झाला, विद्यार्थिनींनी किती फायदा करुन घेतला, समाजाची व देशाची कितीक कामे त्यांच्याकडून घडून आली व त्या सर्वांचा सविस्तर उल्लेख एकूण कार्याचा इतिहास - 'स्मारक ग्रंथ' लिहिला गेला. आणि ....

त्याचाच येथे अभिमानपूर्वक संदर्भाचा (काही) उल्लेख करू शकले याचाच आनंद वाटतो. धन्यता वाटते. .. 'निदान मॅट्रिक पर्यंत शिक्षण' ही विचारसरणी मागे पडल्याचे द्योतक होय.

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, क्रांतीपेक्षाही महिलांनी संक्रमणावस्थेत टाकलेली पावले तसेच पाश्चात्य वाङ्मय व शास्त्रीय ज्ञान जोडीने अभ्यासून महाराष्ट्रीय स्त्रिया विश्वासास पात्र ठरल्या. अशा या परिचयाच्या योगाने ज्ञानात भर पडून दैनंदिन जीवनात परिवर्तन झाले किंवा कसे त्याचा शोध घेण्यासाठी त्यांचीच चरित्रे - आत्मचरित्रे पहावी लागतील. पैकी एक 'बोलके उदाहरण' पुढे देत आहे...

लक्ष्मीबाई वैद्य, मूळ रत्नांगिरीच्या बालविधवा. शिक्षणाची विलक्षण आवड जाणून वडिलांनी शाळेत पाठवले. अल्पवयातही प्रगल्भतेचे तेज व शिक्षणाचे धाडस रत्नगिरीच्या पटवर्धन हायस्कूल मध्ये दिसून आले.

•••

१९१८ – २४ मधील यश उल्लेखनीय सोवळे ओवळे संदर्भात ताईची चिकाटी वाखवाणण्याजोगीच होती. ताई -भाऊ एकाच वर्गात होते. त्यामुळे पुस्तकांचा संच एकच असे. त्याकाळी मासिक पाळी असता तीन दिवस शिवशिव होऊ नये म्हणून पाळावे लागत .. परीक्षेसाठी पुस्तक वापरताना सुती दोऱ्याने शिवलेले उसवून पोथीसारखा अभ्यास करुन ते पुस्तक भावास दिले जाई.. पुढे (हीच ताई वयाच्या ५० व्या वर्षी अमेरिकेस एकटी जाऊन आली.)मॅट्रिकनंतर पुण्यास वास्तव्य घडून त्या पुण्याच्याच झाल्या.

पुण्यास 'गृहजीवनशास्त्र' विषयक उत्तम कामगिरी हातून घडून विकास हुजूरपागेतच झाला. १९३५ मध्ये सदर विषयाचा स्वतंत्र विभाग सुरू केला. कामाचा व्याप एवढा वाढला की महाराष्ट्रातील मुलींच्या विद्यालयाचे चालक सल्ला घ्यायला येत. त्याचेच प्रत्यंतर मुलींच्या शाळातून, प्रयोगशाळांतून झाल्याचे दिसून येते.

गृहशास्त्रावरील त्यांच्या लेखनाचा फायदा हुजुरपागेस मिळून अतूट सेवेचे फळ म्हणजे ताईंच्या मनातील स्थित्यंतरे' वर्णनात आढळतात.

१४ व्या वर्षी पुस्तकांची वेष्टने काढणारी ताई पुढे स्पृश्यास्पृश्यता मानत नसत.. त्या बदलचा त्यांचा विचार मननीय आहे...

'आपल्या क्षेत्रात प्रत्येकाने थोडके करावे त्याने समाज वर येतो' हे त्यांचे अमर सूत्र होय.

सौ. सुनीता गणपुले
बी २ / १०४, विकास कॉम्प्लेक्स,
एल. बी. शास्त्री मार्ग,
ठाणे – ४०० ६०१
दूरध्वनी – २५४७८५८९

●●●

## श्री दत्त गुरूंचे २४ गुरू

**पृथ्वी** – शांती, क्षमा व परोपकार

**वायू** – कोणत्याही परिस्थितीत मार्गक्रमित असावे.

**आकाश** – भेदाभेद न करता सर्वांना समान वर्तणूक देणे व विशालता. **उदक** – सर्वदा निर्मळ असणे.

**शशी (चंद्र)** – शीतलता व मरण हा देहधर्म आहे त्याच्या आत्म्याशी संबंध नाही.

**अग्नी** – पवित्रता, कशालाही आपल्यात सामावून घेण्याची वृत्ती **सूर्य** – परोपकार, स्वयंप्रकाशित

**कपोत** – नाशवंत वस्तूंवर प्रेम न करता सदैव स्वानंदी राहावे.

**अजगर** – अन्नाची चिंता न करता सदैव परमार्थाचे चिंतन करावे. **समुद्र** – गंभीरता व निर्मलता.

**पतंग** – कशाच्याही मोहात पडू नये व स्वत:चा नाश ओढवून घेऊ नये.

**भृंगा** – प्रपंचात गुंतून न राहता परमार्थ साधावा.

**माशी** – कशाचाही संचय न करता त्याचा उपभोग घ्यावा. **हत्ती**– विषयवासनेपासून अलिप्त राहावे.

**मृग** – मनाची चंचलता टाळावी, नसता प्राणांना मुकावे लागते.

**मासा** – सतत शरीरात पाणी घेतो तसे सतत ज्ञानग्रहण करावे.

**पिंगला** – पश्चातापाने जीव मागील सर्व पापातून मुक्त होतो. **कुरर** – योग्य विनियोग करावा, संचय करू नये. **अर्भक** – निराभिमानतेचा बोध.

**कुमारी** – एकच ईश्वर मानावा व त्याचीच पूजा करावी.

**सर्प** – एकान्त

**कातीण** – सर्व जगत कोणी व का निर्माण केले या शंकेच्या निवृत्तीकरिता.

**लोहार** – चित्तवृत्ती एकाग्रता आणि अंतर्मुख असणे परमार्थाचे लक्षण होय.

– संकलित

# पसायदान

*संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदान संदर्भातील हा लेख – संपादक*

## सामान्य माहिती

ज्ञानेश्वर माउलीचे मागणे शब्द रूपाने कृपारूपाने आपल्याला दिलेला मोठा प्रसाद आहे. त्यातील भावना उदात्त व लोककल्याणकारी आहेत. पसायदान अनेकांना पाठ आहे. कार्यक्रमाचा शेवटी प्रार्थना म्हणून बहुतकरून ती म्हटली जाते. ती समजावयास सोपी आहे. ती केवळ प्रार्थना नसून जीवनाला मार्गदर्शक होणारी विचारधारा आहे. श्रीमत् भागवत पुराणातील प्रल्हादाने केलेल्या नृसिंहरूपधारण केलेल्या भगवंताच्या प्रार्थनेशी ही मिळती जुळती आहे.

स्वस्त्यस्तु विश्‍वस्य खल:प्रसदिताम । ध्यायन्तु भूतानि शिवं मिथोधियाम् ।
मनश्‍व भद्रं भजातां अधोक्षजे । आवेश्यतांनो मतिरप्य है तुकी ॥ ५.१८.९

ज्ञानेश्‍वरांनी व्यक्तिगत व सामाजिक जीवन अधिकाधिक आनंदमय होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचा सुसूत्र विचार मांडणारे स्वरूप पसायदानाला दिले आहे. पसायदान एक पोकळ प्रार्थना नसून प्रत्यक्ष जीवनस्पर्शी असणारी समाज सौख्याशी सुसंवाद आणि उच्च फलदायी अशी वैचारिक बैठक आहे. ही प्रार्थना देशातीत व काळातीत आहे. कारण या प्रार्थनेत व्यक्ती व समाज या दोघांच्याही जीवनाला योग्य वळण लावणाऱ्या मूलभूत गोष्टींचा विचार केला आहे. ही प्रार्थना कोणा एका देवतेला उद्देशून नाही. विश्‍वात्मक सर्वव्यापी तत्त्वाशी तिचा संबंध जोडलेला आहे. मानवी जीवनाच्या सर्वश्रेष्ठ आकांक्षेचे आदर्श विचार म्हणून तिच्याकडे पाहावे. ही प्रार्थना अगर हा जीवन विचार सर्व मानवासाठी माउलींनी शब्दांकित केला आहे.

खळांची व्यंकटी सांडो-मानवाने आपल्या अंत:करणातील दुष्टभाव काढून टाकण्यास प्रयत्न करावा. सत्कर्मी रति वाढो । आणि सर्वांशी प्रेमाने वागावे हा मौलिक विचार मांडलेला आढळतो. या प्रार्थनेत सद्‌भावनाना प्रेरणा देणारी मोठी शक्ती आहे. सद्‌भावना जागृत होऊन मानवी व्यवहार शुध्दतेचा व्हावा. उदा. मैत्री, समंजसपणा, धर्म-नीती याना अनुसरून होत राहावा जेणे करून सर्व मानवी जीवन सुखी आणि-परिपूर्ण व्हावे अशी ही प्रार्थना आहे. जीवन सुखी, समाधानी होण्यासाठी आवश्यक सर्व मूलतत्त्वांचा विचार अवघ्या नऊ ओव्यात मांडण्यात आलेला आहे.

आता विश्‍वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥१॥

आता म्हणजे गीता सांगून संपल्यावर विश्‍व ज्याचे स्वरूप आहे अशा देवाने या वाङ्मय यज्ञाने संतुष्ट व्हावे आणि संतुष्ट होऊन मला हे पसायदान द्यावे. माउली म्हणते, या कारणे मिया । गीतार्थ मऱ्हाटिगा ।

केला लोका राया । दिठीचा विषो ॥ १८-१७३५

ज्ञानेश्‍वरी हा ग्रंथ गुरु कृपेचे वैभव आहे. या ग्रंथाच्या रूपाने माझ्या हाती समाधिधन बांधून दिले. किंबहुना तुमचे केले । धर्म किर्तन हे सिध्दी गेले ।

येथ माझे जी उटले । पाईक पण । १७९२

या पार्थिकाला स्वामी जवळ मागण्याचा अधिकार आहे म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी हे दान त्यांच्यापाशी मागितले आहे. आता गीतेवरील व्याख्यानाची सांगता झाल्यानंतर केवळ तत्त्वज्ञान ऐकण्यापेक्षा ते अंगी बाणविण्याचे महत्त्व ज्ञानेश्वराना आधिक वाटते.

अर्जुना तू परिससी । परसोनी अनुष्ठिसी । तरी आम्हासी आम्हासीचि वानी कायसी । सांगावयाची। ५:१६९

त्यासाठी चांगल्या प्रेरणा जागृत व्हाव्यात म्हणून गीता ग्रंथ निरुपिला तैसा वाग् विलास विस्तारू। गीतार्थे विश्वभरू। आनंदाचे आवास मांडूजगा। १३-११५९

प्रार्थना हे धार्मिक वा आध्यात्मिक जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. प्रार्थना अनेक प्रकारच्या संभवतात काही ऐहिक भोग प्राप्तीसाठी, पारत्रिक भोगप्राप्तीसाठी, मोक्षासाठी, स्वत:साठी, दुसऱ्यासाठी, सर्वासाठी. ही प्रार्थना कुणापाशी केली आहे यावरूनही तिचे स्वरुप ठरत असते. प्रार्थना मानवी स्वभावानुरूप सात्विक, राजस, तामस असू शकते. सात्त्विक प्रार्थना उदार असते सर्वेऽपिसुखिनः सन्तु ।. नामदेव प्रार्थना करतात. आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा। माझिया सकळा विष्णुदासा। तुकाराम प्रार्थना करतात, हे चि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।

ज्ञानदेव प्रार्थना करतात. लोकांच्या वृत्तीचे दैन्य गेले पाहिजे. त्याना सुखाची प्राप्ती झाली पाहिजे. हे मागणे अखिल मानवासाठी तसेच चराचरासाठी आहे. वैयक्तिक काहीच नाही.

ही प्रार्थना विश्वात्मक देवाजवळ केलेली आहे. विश्वात्मके देवे. ज्ञानेश्वराना सद्गुरु व देव एकच वाटतात. ते म्हणतात - जयजय देव श्री गुरो। अकल्पनारण्य कल्पतरो।अ. १८ आता विश्वात्मकु हा माझा। स्वामी श्री निवृत्ति राजा। तो अवधारू वाक्य पूजा। ज्ञानदेवो म्हणे। १५.५९८

देव - दिव प्रकाशणे जो स्वत: प्रकाशमान आहे तो देव, सूर्य, चंद्र, तारे तेजोमय परंतु त्यांचे तेज भौतिक - ते कार्यरूप आहे. हा देव स्वतः प्रकाशमान, भौतिक तेजानाही प्रकाशित करणारा - तेन भासा सर्वं इदं विभाति। (कठ उप.) तन् तेजो विद्धिमामकम्। थोडक्यात, सर्वांचा प्रकाशक तो देव.

आता प्रकाशही चार प्रकारे संभवतात - जड प्रकाश - चंद्र, सूर्य तारे भौतिक प्रकाश विकारी प्रकाश - अंतःकरणात प्रतिबिंबित होणारे चैतन्य हे जागृती स्वप्न यातच भासमान सुषुप्तीत लोप म्हणून विकारी हाच जीव

चित् अविकारी - साक्षी कूटस्थ, चैतन्य, उदासीन,

स्वयंप्रकाश - ब्रह्म हे सर्वांनाच प्रकाशित करते. त्याच्या ज्ञानाने सारे जाणले जाते. चवथा प्रकार हा देव या शब्दाशी जुळतो.

विश्व - नित्य निर्माण होणारे व नष्ट होणारे जडजगत् मात्र सामान्य मानव यालाच परमार्थाने सत्य मानतो. मूळ स्वरूपाचा शोध तो कधीच घेत नाही.

विश्व आणि देव याबद्दल गल्लत अनेक विद्वानही करतात. विश्वात्मक - विश्वआत्मा यस्य सः। विश्वच आहे स्वरुप ज्याचे तोच देव या दोघांचे ऐक्य दाखविले आहे. जग सुखी होण्याशी अथवा दुःखी राहण्याशी माझा काय संबंध? आत्मरूपाने मीच सगळी कडे व्यापून आहे. या तत्वतः सत्यवास्तवाचा त्याला आधार असावा म्हणजे याचे उत्तर मिळेल. नादत्ते कस्यचित् पापं न चैव सुकृतं विभुः। गीता.

या विश्वरूपाच्या चरणी आपली शब्द फुले अर्पण करताना ज्ञानदेव म्हणतात -

भरोनि सद्भावाची अंजुळी। मिया ओविया फुले मोकळी।

अर्पिली अंध्रियुगळी। विश्वरूपाच्या।

निवृत्तीनाथांबद्दल वाक् पूजा करताना माऊली म्हणते

आता विश्वात्मक माझा। स्वामी निवृत्ति राजा। तो अवधारू वाक्यपूजा। ज्ञानदेव म्हणे। वाक्यज्ञ - मन एकाग्र करून पूर्ण अवधान देऊन ज्ञानग्रहण केले जाते. तोही एक यज्ञच होय. अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः। ज्ञान यज्ञेन तेनाहं इष्ट स्यां इति मे मतिः। १८.७०

परी ते मनाच्या कानी ऐकावे। बोल बुद्धिच्या डोळा देखावे। ज्ञानदेव व्याख्या करतात -

शद्बे शद्ब यजिजे। तो वाक् यज्ञ म्हणिजे। ४.१०२ शद्बात शद्बाचे हवन करणे. या यज्ञकुंडात (मनबुद्धींच्या) ज्ञानाग्नि पेटलेला असतो, सुखदुःखादि द्वंद्व चित्त समत्व हीच वेदी, आत्मानात्म विवेक-मंत्र, वासनांच्या शमनामुळे मनःशान्ती या यज्ञातील पात्रे, जीव, हवन करणारा यजमान, या यज्ञात भेद-पशूचा नाश केला जातो. अज्ञानाची पूर्णाहुती दिली जाते. परिणाम यजमान आत्मौपम्य बुद्धीने सर्वत्र एकच आत्मतत्व पाहातो. शब्द शक्ती माणसाचे मन घडवू वा बिघडवू शकते कारण विचार आणि विकार शद्ब द्वारे प्रगट होतात. अग्नीचा उपयोग अन्न शिजविण्यासाठी वा घरे जाळण्यासाठी होतो तसेच शद्बाचे आहे. अग्नि वाक् भूत्वा मुखं प्राविशत्। वाक् शक्ती ही अग्नि सारखी दाहक का आहे हे ध्यानात येईल. शद्ब नाही तर विचार नाही - एकमेकाना समजणे नाही. ज्ञानदेव म्हणतात ही वाङमय सेवा गोड करून घ्या व प्रसन्न होऊन पसायदान द्या. पसाव-प्रसन्नता देणारा प्रसन्न होऊन देतो. प्रसादे सर्व दुःखानां हानिस्य उपजायते। या वराने ज्ञानदेव प्रसन्न झाले म्हणजे घेणाराही प्रमुदित झाला.

जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो।

भूता परस्परे पडो। मैत्र जीवाचे ।।२ ।।

दुष्टांचा वाकडेपणा टाकला जावो. त्यांची सत्कर्मात आवड वाढो. प्राणिमात्रांचा एकमेकांशी अंतकरणापासून स्नेहभाव जडो. याओळीपासून समाज विषयींच्या जिव्हाळ्याने भरलेले माउलीचे हृदयच प्रगट झाले आहे. इथे समाजाकडून उपेक्षा भोगून उपहास होऊनही त्या समाजाच्याच हिताच्या कळवळ्याने परमेश्वराजवळ प्रार्थना चाललेली आहे. हे त्यांचे श्रेष्ठ प्रतीचे वागणे आहे. म्हणून मागणे ही श्रेष्ठ प्रतीचे आहे. विश्वात जे काही वाईट आहे ते जावे उत्तम आहे ते वाढावे यासाठी प्रार्थना आहे. हे मागणे ऐहिक जीवनाविषयी आहे. माणसाला आपले जीवन घडवून सर्व दुःख आणि दैन्य याच्या पलीकडे पोहोचता येते. यावरील त्यांचा विश्वास यातून प्रगट होतो. माणसाला हिणकस टाकता येते. शुद्ध आनंददायी विश्व निर्माण करता येते. हाच तो विश्वास. माणसाची सुखदुःखे अंतरंगावर अवलंबून खळ-दुष्टप्रवृत्तीचा माणूस दृष्ट प्रवृत्तीच नष्ट होवो. खळ कसा असतो- मधुतिष्ठति जिव्हाग्र हृदये तु हलाहलम्। खळ पुरुष काही वेळा सत्ता संपत्ती, वैभव सामर्थ्य यानी संपन्न असतात. मात्र त्यांचा ते गैर वापर करतात. विद्या विवादाय धनं मदाय शक्तिः परेषा परपीडनाय।

खलस्य साधोः विपरीत मेतत् ज्ञानाय दानाय च रक्षणाय ॥

अशा वेळी ही खळवृत्ती समाजाला त्पपदायक ठरते. खळांचीव्यंकटी सांडो हे - म्हणण्यात दोन उद्देश आहेत. एक दुष्टांचा वाकडेपणा जाऊन इतरांचे जीवन सुखाचे व्हावे. दुसरा भाग महत्वाचा. खळांचे स्वतःचे कल्याण व्हावे. माणूस मुळात पापी नसतो. काम क्रोध या विकारांना बळी पडून दुष्कर्मांकडे प्रवृत्त होतो. दुष्ट माणसात ही काही चांगले गुण असतात. मात्र गुणांचा विकास प्रयत्नपूर्वक करावयाचा असतो. असे झाल्यास खळत्व टाकून माणसे सज्जनही होऊ शकतात. अनेक उदाहरणे देता येतील.

वाल्या कोळीचा वाल्मीकी, अजमिळ, पिंगळा, विसोबा खेचर, यानी खळत्व घालविले, आईला सद्गुणीमुला पेक्षा दुगुणी मुलाची अधिक काळजी लागते. याचे कसे होईल? असा प्रश्न सतत तिला पडलेला असतो. त्याच्या कल्याणासाठी तिचे हृदय तळमळत असते, तसे - ज्ञानेश्वर माउलीला दुर्जनांच्या हिताची काळजी लागून राहिली होती म्हणून देवा जवळ मागणे मागताना सुरुवातीलाच खळांचा वाकडेपणा जाऊ दे असे ते म्हणतात.

तया सत्कर्मी रती वाढो - त्यांच्यात सत्कर्माची आवड निर्माण होतो. दुष्टावा नाही परंतु सत्कार्माचरण करीत नाही तीही माणसे व्यर्थ जीवन घालवितात. म्हणून माऊली म्हणते, सर्वांच्या ठिकाणीच सत्कार्माबद्दल प्रेम निर्माण होवो. सत्कर्माने मनुष्याच्या जीवनाचे सार्थक होते. व समाजाला सुख लाभते. असा दुहेरी लाभ प्राप्त होतो. नित्य कर्माने मनोमालिन्य, नैमित्तिक कर्माने पितर, देव आणि समाज यांचे ऋण फेडता येते. काम्य कर्माने भोग प्राप्ती व प्रायश्चित कर्माने पापक्षालन करता येते.

योग्य व आयोग्य कर्म कशावरून ठरवावयाचे हे जरा अवघड आहे. जे स्वतःला व समाजाला हितावह होईल ते करत रहावे हा मध्यम मार्ग. शास्त्राच्या आधारे वर्तावे म्हणजे अडचण पडत नाही. शास्त्रप्रमाण ते कार्याकार्य व्यवस्थिती । स्वर्गा पुण्यात्मके पापे येईजे । पापत्मके पापे नरका जाइजे । मग माते जेणे पाविजे । ते शुद्ध पुण्य । ९.३१९

सज्जनांचा सहवास, विरक्ती, सद्गुरु सेवा, योग, ज्ञान, यांची साधना यांच्या अवलंबनाने अज्ञान नष्ट होऊन अहंकार ब्रह्मस्वरूपातलीन होतो. कर्माची गती खरोखरच गहन आहे. आसक्ती व फलाशा टाकून भगवत् अर्पण पूर्वक कर्म करावे हा उत्तम मार्ग. मद्रूप होऊन कर्म कर तीच रती (आवड) तीर्थाने बाह्यमळ तर सत्कर्माने मनोमळ धुतला जातो. माणसाचे कर्म हे त्याचे अंतरंग दाखविते. प्राप्त कर्म निष्ठेने करणे हे सत्कर्मच आहे. निष्ठा परमात्म सेवाभाव- उदाहरणे सावतामाळी, नरहरी सोनार, सेनान्हावी, या लोकांनी आपला व्यवसाय निष्ठेने केला व ते महत् पदाला पोहोचले. थोडक्यात, परमात्म्याची सेवा म्हणून केलेले कर्म ते सत् कर्म.

भूतापरस्परे पडो मैत्र जीवाचे-मनातून एकमेकाबद्दलचा जिव्हाळा एकमेकांच्या हिताची कळकळ ही खरी मैत्री. तुकाराम महाराज शेत रक्षण करण्यासाठी गेले. तेथे ते भजन करीत बसले. त्यांच्या जवळ न येता पक्षी उडून जात. त्यांना वाईट वाटे. माझ्यात दुष्टावा आहे. हे पक्ष्यांना कसे कळले. त्यानी भगवंताची आळवणी केली. मग ते पक्षी त्यांच्या अंगाखांद्यावर येऊन बसू लागले. मैत्र कुणाचे होते? जिथे मनातील खळत्व गेले आहे. सत्कर्मात मन रमू लागले आहे, त्यांच्यात मित्रता होते त्यातून जगाचे कल्याण होते.

लोकांच्या आधाराने मनुष्य सत्तेवर राहतो. मात्र लोकांची सत्ता आपल्यावर चालू नये असे त्याला वाटते. असा समाज व मानव यांचा परस्पर संबंध असतो. इतर लोक परके नसून एकाच परमेश्वराचे अंश आहेत हे समजल्याने आत्मीयता वाढते. प्रेम करणे व प्रेमात गुंतणे ह्या दोन गोष्टी वेगळ्या आहेत. पहिले व्यापक प्रेमाचे दर्शक, दुसरे विषयासक्तीत अडकणे आहे. मैत्र व्यापक प्रेम

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।३ ।।

पापाचा अंधःकार जावो विश्व स्वधर्मरूपी सूर्याने प्रकाशित होतो. प्राणिमात्र जो ज्याची इच्छा करील, तो ते प्राप्त करो.

द्वंद्वाचा नाश - तिमिर - अंधकार - आवरक - झाकणारा, अज्ञान ज्ञानाला झाकाळून टाकते. अज्ञान व पाप (दुरित) यांचे संबंध जवळचे आहेत. अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः । अज्ञानाने मोह निर्माण होतो तो

तमोगुणाचे कार्य. प्रमाद, मोह, अविवेक निर्माण होतो. प्रमाद मोहोतमसो भवतोऽज्ञानमेवच ।१४.२७ विकारांच्या आधीन होऊन विषय प्राप्तीसाठी जो निषिद्ध कर्म करतो त्यालाच दुरित म्हणजे पाप म्हणतात. असे पाप जन्माची हानी तर करतेच शिवाय इतरांच्या जीवनातील सुखही हिरावून नेते. अमोल मानवी जीवनाला उध्वस्त करणारा हा दुरितांचा अंधःकार आहे. धर्म हा ज्ञान, सुख, शांति, सत्य, स्वातंत्र्य इत्यादिचे प्रकाशन करतो. सूर्य; अंधार नाहीसा करतो, तसा स्वधर्म पाप नाहीसे करतो.

स्वधर्म जन्म कर्माने प्राप्त होणारे वर्णाश्रमानुसार विहित मानवी कर्तव्ये. आपले कर्तव्य माणसाने निष्ठेने केले पाहिजे तीच ईश्वर पूजा ठरते. तया सर्वात्मका ईश्वर । स्वकर्म कुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषा लागी।१८.९१७ आपले प्राप्त कर्तव्य व्यापक लोक हित लक्षात ठेवून कर्म ईश्वरदत्त समजून त्यावर निष्ठा ठेवून केले पाहिजे. तुम्ही जो कोणी असाल त्या पद्धतीने व निष्ठेने आचरण करा. स्वधर्म पालनाने स्वतःचे व समाजाचे धारण पोषण होते. म्हणून ते पवित्र व पुण्यकारक. जीवनात असे प्रसंग येतात. विशेषधर्म व सामान्यधर्म यामधे विरोध निर्माण होतो.

सैनिकाने शत्रूवर गोळ्या झाडल्याच पाहिजेत. इथे अहिंसेचे स्तोम व्यापक हित लक्षात घेऊन बाजूला सारावे. अन्नासाठी भुके मरावे का चोरी करावी हा फार व्यापक प्रश्न आहे. भक्ती हा श्रेष्ठ धर्म आहे. मानवी जीवनातील पोकळी नाहीशी होते. ज्ञानासारखे पवित्र या जगात काहीच नाही. ज्ञान सूर्याचा उदय हा अज्ञान अंधःकाराचा-पापाचा नाश करतो. ज्ञान आणि भक्तीने युक्त भगवत् शरणागति माणसाचे सर्वश्रेष्ठ साध्य आहे.

जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात। ज्याला ज्याची इच्छा असेल, ते त्याला लाभो. आपल्या प्राप्त कर्तव्याचे म्हणजेच स्वधर्माचे पालन माणसाने उत्तम प्रकारे केले म्हणजे या जगात ज्याला जे पाहिजे त्याला ते प्राप्त होईल. इच्छा ही जबरदस्त प्रेरणा आहे. धर्माच्या कक्षेत प्रवर्तित झाली तर कल्याण साध्य होते. अन्यथा ती इच्छा दुरिताकडे नेते. न्याय गोष्ट पूर्ण करण्यासाठीच धर्माशी कास धरावी.

वर्षत सकळ मंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूमंडळी। भेटतु भूता।।४ ।।

संपूर्ण मंगळाचा वर्षावकरीत ईश्वरभक्तांचा समुदाय नित्यजगतात भूतजगतात भूतमात्राना भेटो.

सत्संगाला विशेष महत्त्व आहे. तो आपल्याला श्रेष्ठपद प्राप्त करून देतो. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टवीति परोपकारे।

भूतांची दया हे भांडवल संतां। आपुली ममता नाही देवा। तुकाराम. महत् सङ्गःस्तु दुर्लभःअगम्यः अमोघश्च। नारदभक्ती सूत्र -३९. मंगल-कल्याण शिव भद्र शुभ हे समानार्थी शद्ब आहेत. भद्र. कर्णेभिः श्रुणुयामदेवाः। ही मांगल्याची मागणी आहे. वर्षत-वर्षाव करीत. सकळ-संपूर्ण परमात्मा हा मंगल धाम. पवित्राणां पवित्रं यो मंगलानांच मंगलं। जय जय देव निर्मळ। निज जन अखिल मंगळ।१८-१. मधुराधिपतेः अखिलं मधुरं। संत उदारपणे मांगल्याचा वर्षाव करतात. पाप ताप दैन्य केवळ त्यांच्या कृपाप्रसादाने नाहीसे होते.

**विषय निष्ठा व ईश्वरनिष्ठ**

कशावरतरी मानवाची निष्ठा असतेच. देह हाच आत्मा समजून सगळे व्यवहार होतात. स्वर्ग प्राप्तीसाठी यज्ञ-काम्य फळ प्राप्तीसाठी व्रताचरण. विषयनिष्ठाही जीवाला बंधनात घालते. विसिन्वन्ति अवबध्नन्ति इति विषयाः। देव भक्ती करणारे, देवभक्त, अगर ईश्वर निष्ठ, समजले जातात. मात्र त्यांची निष्ठा व्याभिचारी आहे. माऊली म्हणते - ऐसा अखंड भजन करी। उगानसे क्षणभरी।

आघवोनि गावद्वारी। अहेव जैसी।१३-८२१

स्वैरीणी पतीवर प्रेम दाखविते मग मात्र विषयाकडे लावते. विषय साध्य न झाल्यास भगवंतालाच सोडचिठ्ठी देते.

ईश्वरनिष्ठा-क्षुद्र विषयनिष्ठा टाकून ईश्वर निष्ठ होणे म्हणजे सकळ भोगांचा त्याग करणे असे नाही. भोगनिष्ठ न होता म्हणजे भोग हेच जीवन सर्वस्व न मानता भोग स्वीकारत असताना मन मात्र त्यात न रमता ते ईश्वरकडे धाव घेते. शरीर धर्मामुळे सर्व कर्मे घडत असताना त्या कर्मांत तो अडकत नाही. कल्याण करणाऱ्या परमात्म्यावर त्याची निष्ठा म्हणजे प्रेम जडलेले असते.

आणिक मी वाचूनि काही। आणिक गोमटे नाही। ऐसा निश्चयोचि तिही। जगाचा केला। एक मी वाचुनि वास। न पाहति आन। निष्ठा म्हणजे परमात्म्यशी एकरूपत्वाचा प्रत्यय. ज्याज्या स्थळी हे मन जाय माझे। त्यात्या स्थळी ते निजरूप तुझे। अशी अवस्था. अशी व्यापक ईश्वर निष्ठा ज्यांचा ठिकाणी असते तेथेच दैवी गुणांचे वास्तव्य असते. मांदियाळी - समाजात ईश्वरनिष्ठ सज्जनांची मोठी संख्या निर्माण झाली पाहिजे. म्हणजे समाजात निर्माण होणाऱ्या अनिष्टांचा पाप जनक अमंगलाचा नाश होईल. मंगलमय वातावरण निर्माण होईल. मांदियाळी-समूह, मेळा-ईश्वर निष्ठेने प्रस झालेल्या दैवी सामर्थ्याने लोकजीवन शुद्ध व मंगळ करण्याचे कार्य व्यक्त स्वरूपात ईश्वर संत महत्मे करीत असतात. समाजात सुख नांदावयाचे असेल तर त्यासाठी समाजाला योग्य वळण लावण्याचे सामर्थ्य असलेल्या तेजस्वी दैवी संपत्तीने संपन्न व समाजाबद्दल अंत:करणात खरी कळकळ असलेल्या अविचळ निष्ठेच्या सज्जनांचे समुदाय या भूतलांवर निर्माण झाले पाहिजेत. भय दडपण पाप या दुष्कृत्यांची टोचणी नसते, भोग स्वीकारताना दुसऱ्याला त्रास होणार नाही अशी काळजी घेतली जाते. तेव्हा जीवनात पावित्र्य आणि प्रसन्नता नांदते. तेच हृदयात मांगल्य निर्माण करते. भेटतु भूता - ईश्वर निष्ठ सज्जन लोकांपासून दूर असतात. ते नित्य लोकांना भेटत राहावेत आत्मानंदात मग्न असलेली मंडळी एकांत सेवन करीत असतात. आपल्या विचार धनाचा लाभ सर्वांना करून देतात. दास डोंगरी राहतो। चिंता विश्वाची करतो। इतकेच काय थोर तत्त्वचिंतक, समाज, शास्त्रज्ञ, वैज्ञानिक हे साधारण एकांतप्रिय असतात. इथे भेटतु याचा अर्थ मार्गदर्शन प्रस होणे असाच घ्यावा. संत महात्मे अलिप्त असतात. परंतु त्यांच्या मार्गदर्शनात विश्वाचे कल्याण करण्याचे सामर्थ्य असते.

समाजाच्या कल्याणासाठी ईश्वर निष्ठाच का?

काही लोक म्हणतात दिखाऊ ईश्वर निष्ठेपेक्षा ईश्वर न मानणारी आणि लोकांच्या हितासाठी देह झिजविणारी व्यक्ती केव्हाही श्रेष्ठच. ही गोष्ट मान्य करूनही असे सांगावेसे वाटते. ईश्वर निष्ठ नसणारी व्यक्ती स्वत:च्या व इतरांच्या जीवनात भौतिक सुख आणू शकेल. पण मांगल्य आणू शकणार नाही. कारण मांगल्याची कल्पनाच त्याच्या भौतिक तत्त्व प्रणालीत बसणारी नाही. ईश्वरनिष्ठा खरी असेल तरच अमंगलातून तो मांगल्याकडे जातो. गीताकार म्हणतात सुदुराचार: यदि मा अनन्य भाक् भजते सम्यग् व्यनसितो भवति। शश्वत् शान्ति निगच्छति। गीता ३०/३१. समाजात बुद्धिप्रधान मानवापासून भावना प्रधान मानवापर्यंत या दोन्हीचे कमी-अधिक मिश्रण असते. सर्वांनाच जीवनात काही निष्ठांची आवश्यकता भासते. या निष्ठा विकाराकडे नेणाऱ्या आहेत. मनातील सर्व उदात्त मंगल, सर्वलोक हितकारी तत्त्वे ईश्वर रूपात मूर्त होतात. या स्थिर परमतत्त्वावर ज्याची अविचल निष्ठा असते, तो खरा ईश्वरनिष्ठ. सज्जन सात्त्विक जीवन जगतात. ईश्वर निष्ठा जीवनात शुचिता निर्माण करते. हा मंगलाचा खरा वर्षाव होय.

चला कल्पतरूंचे आरव।चेतना चिंतामणीचे गांव। बोलते जे अर्णव। पीयूषाचे ।।५।।

चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वा हि सदा सज्जन। सोयरे होतु।।६।।

चालते कल्पवृक्षाचे उद्यान, सचेतन चिंतामणीचे गाव, आणि बोलते अमृताचे सागर तसेच जे निष्कलंक चंद्र, जे तापरहित सूर्य असे सज्जन सर्वांना सदा प्रिय होवोत. चलाकल्प तरूचे आरव. ही सारी सज्जन संत विषयक उपमाने आहेत. कल्पतरू, चिंतामणी, समुद्र, चंद्र, सूर्य, उपमान साधर्म्यामुळे अभेदात्मक होतो तेव्हा ते रूपक अलंकार होते. रूपके तीन प्रकारची संभवतात - न्यून रूपक, समरूपक, आणि आधिक रूपक. संत कल्पतरू पण चालते, बोलते हा अधिक रूपक. संतांच्या बरोबरीची वस्तु या जगात नाही. संत गुणाधिक्याने श्रेष्ठच ठरतात. कल्पतरू हा एखादाच असतो. परंतु संत आरव म्हणजे उद्याने आहेत. चिंतामणी - चिंतादूर करणारे रत्न - संत चिंतामणीचे गांवच, रत्न हे जड, मात्र संत चेतन चिंतामणी आहेत.

बोलते जे अर्णव। पीयूषाचे - संत समुद्रासारखे विशाल, नित्यतृप्त व पूर्ण असतात. समुद्र लोकांची तहान भागवू शकत नाही. मात्र संत अमृताने भरलेले समुद्र आहेत. याकडे लक्ष पाहिजे. तरी अवधान एकले दीजे। मग सर्व सुखासी पात्र होईजे।

हे प्रतिज्ञोत्तर माझे। उघड आईका। असे माऊली म्हणते. चंद्रमे जे अलांछन. चंद्र शीतल असल्याने हलाहलाचा दाह शांत करण्यासाठी शंकरानी त्याला मस्तकी धारण केले. चंद्र दर्शनाने समुद्राला भरती येते. सोमकांत मणी द्रवतो. कुमुदिनी विकसित होते. चकोराना चंद्र किरणाचा चारा मिळतो. चंद्र म्हणजे अमृताचे सरोवर तो वनस्पतींना रस पुरवितो. धान्याचा सुकाळ करून प्रणिमात्राना जीवदान देतो. चंद्रांची शीतलता राव आणि रंक याना सारखीच तसेच संतांचे हृदयअसते. चंद्राकडे तीन दोष आहेत. त्याचा अंगावर असलेला डाग , हे त्या तीन दोषाचे प्रतीक क्षयी, कामी, पर प्रकाशित. पुराणात या विषयक कथा आहेत. संत सदापूर्ण चंद्र फक्त पौर्णिमेलाच पूर्ण, चंद्र सूर्याकडून प्रकाश घेतो, संत स्वयंप्रकाशी, अज्ञानाला मळ, कलंकलांछन असे म्हटले जाते. या मनोमलापासूनही संत विराहित असतात.

मार्तंड जे तापहीन - ही आवडती उपमाने आहेत. लौकिक सूर्य आपल्या प्रकाशाने विश्वप्रगट करतो. सद्गुरु विश्वाचा आभास नष्ट करतो. हा जीव रूपीअमर सूर्योदयाबरोबर मुक्त होतो. ज्ञानाग्नि संसारवने जाळून टाकतो. अज्ञान अंध:कार नाहीसा करतो. या सामर्थ्यात कुठेही ताप होईल असा दुर्गुण संतांच्या ठिकाणी आढळत नाही.

ते सर्वाहि सदा सज्जन सोयरे होतु-

ईश्वरनिष्ठेचा अविचल पाया ज्याच्या जीवनाला लाभला आहे. तो सज्जन ही माऊलीची भूमिका आहे. सत्+जन सत् हे परमात्म्याचे स्वरूप लक्षण. या ईश्वरनिष्ठेमुळे त्यांच्यात पावित्र्य, मांगल्य, समाधान, आनंद, विवेक, ज्ञान यांचा उदय होतो. सोयरा-आवडता, प्रिय, इतरांच्या जीवनात खरा आनंद निर्माण होतो.

किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिही लोकी।।
भजिजो आदि पुरुखी। अखंडित।।७।।

अधिक काय मागणे-सर्व सुखाने पूर्ण होऊन तीनही लोकात आदि पुरुष परमात्म्याच्या ठायी अखंड भक्ती ठेवावी.

या ओवीपासून उपसंहार केला आहे. मागणे कधीच संपत नसते- नांतो न चा दि: न च संप्रतिष्ठा। १५-३ असा संसार असल्याने जीवनाचे-स्वरूप सतत बदलत जाते. तसे मागण्यांचे स्वरूपही बदलते. ज्ञाते मूलभूत गोष्टींचा विचार करतात. त्यांच्या मागण्यांचे स्वरूपही बदलते. सर्व मागण्यांचे सार-सर्व लोक सुखाने परिपूर्ण व्हावेत, व अविरत परमात्म्याची भक्ती करावी हाच वर

विश्वात्मक देवा तुम्ही द्या.

काही साध्य गोष्टी, काही साधन, मात्र सुख हे साध्य, कशाचे साधन नाही जीवनातील सर्व गोष्टी सुखाकरता सुख मात्र कुणाचे साधन नाही.

सर्व सुखी - सुखाच्या प्राप्तीने नव्हे. केवळ त्याच्या अपेक्षेने धावाधाव करण्यात आयुष्य संपून जाते. जी वस्तू प्रेमास्पद ती दुःख स्वरुप नसतेच कारण दुःखावर कोणी प्रेम करत नाही. आत्मा हाच सर्वश्रेष्ठ आनंदरूप आहे, आत्माच अत्यंत प्रिय मी असावे असे सर्वांनाच वाटते. यावरूनच आत्मप्रेमाचा प्रत्यय येतो.

भ्रामक सुख - अज्ञानाच्या आवरण व विक्षेप या दोन शक्ती स्वरूपाला झाकणे हे आवरणाचे कार्य आहे. व विपरीत प्रत्यय निर्माण करणे हे विक्षेप शक्तीचे कार्य आहे. स्वप्नात राजा भीक मागत हिंडत आहे असा अनुभव घेतो. जीव हा सुख स्वरूपाचा पण अज्ञानमुळे मूळ सुखरूपतेला विसरून सुखाभास अशा विषयांच्या मागे लागतो.

तैसा हृदयामधे मी राम। असता सर्व सुखाचा आराम।
की भ्रांतावरी काम। विषयावरी। ९-६०

कासवीच्या दृष्टीमधेच आपल्या पिलासाठी अमृत असते. भाग्यहीन माणसे विषय सेवून आपली सुखाची भूक भागवितात. ज्यांना अविनाशी आत्मसुख कळतेच नाही ते या क्षणिक विषय सुखात रमतात.

विषय भोगी जे सुख। ते साद्यंतचि जाण दुःख। परी काय करिता मूर्ख। न सेविता न सरे। ५.११०

परिणाम दुःख - भोगाने होणारे शरीरावर व मनावरील तात्कालिक परिणाम.

ताप दुःख - विषय प्राप्ती, रक्षण, प्रत्यक्ष विषयभोग.
संस्कार दुःख - विषय सेवनामुळे होणारा कर्म संस्कार.

सुखाचे यथार्थ स्वरूप - सुखाची इच्छा प्रत्येकालाच असते, पण त्याचे यथार्थ ज्ञान नसल्याने मनुष्य विषयाला सुख समजून तो धावत सुटतो. ही जाण फक्त ज्ञानी पुरुषाला असते. जीवाला आत्मलाभ होतो त्याला सुख म्हणावे आणि ही अवस्था प्राप्त न होता जगणे ते दुःख, ज्ञानाचे आत्मस्वरुप जाणावे, आनंदमय स्वरुपाला ओळखावे. सुख बाहेर नसून आपल्यातच सामावलले आहे. हे जाणणे हा खरा शाश्वत सुखाचा मार्ग आहे.

सुख आणि सर्वसुख - विषयातील सुख अल्प. तृप्तीचा आनंद मिळणे अशक्य सुखामागे सर्व हे विशेषण ज्ञानदेवानी लावलेले आहे. सामान्य सुख - आंशिक सुख ते अपूर्णच कारण इंद्रियांची भोग शक्ती मर्यादित. मर्यादित म्हणजे अपूर्ण ते सर्व नाही. पूर्ण आहे तेथे सुख आहे. यो वै भूमा तत् सुखं। नाल्पे सुखं अस्ति। जो अमर्याद परमात्मा तोच सुखस्वरूप आहे.

सर्व हा परमात्म वाचक. विष्णुला सर्व असे म्हनतात.

पूर्ण होऊनि तिहीलोकी - आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचे। तिहीलोकी स्वर्ग, मृत्यु, पाताळ या त्रिभुवनात.

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाऽहम् अमृतस्य अव्ययस्यच।
शाश्वतस्यच धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्यच। गीता
१४.२७

भजिजो आदि पुरखी। अखंडित - त्रिभुवन सर्व सुखाने पूर्ण व्हावे आदि पुरुष परमात्मायाला अखंड भजावे.

आणि ग्रंथोप जीविये। विशेषी लोकी इथे।
दृष्टा दृष्ट विजये। होवोवेजी ॥८॥

देवा विशेषत: या ग्रंथाला अनुसरुन जीवन व्यतीत करणारे जे लोक त्यांनी दृष्ट आणि अदृष्ट विषयात विजयी व्हावे. शब्द मानवाचे मनुष्यत्व व्यक्त स्वरुप आहे. ग्रंथ हा संपूर्ण मानवी समाजाच्या संस्कृतीचे आणि ज्ञानाचे व्यक्त

रुप आहे. दृष्ट - इहलोकीचे भोगे अदृष्ट-पारलौकिक स्वर्गादिभोग.

येथे म्हणे विश्वेशरावो। हा होईल दान पसावो।
येणे वरे ज्ञानदेवो। सुखिया झाला ॥९॥

इथे विश्वाचा परमेश्वर म्हणाला हा दानाचा प्रसाद होईल या वराने ज्ञान देव सुखी झाले.

**पसायदान व आपले जीवन**

पसायदानातील विचार अत्यंत उदात्त आहेत. आजही कल्याण प्रद आहेत. आमच्या जीवनात तिला स्थान प्राप्त आहे. ज्ञानदेव या प्रसादाने सुखी झाले आम्ही झालो नाही. मग कशासाठी प्रार्थना करावयाची? आपण या प्रसादाने कुठे बदललो. क्रियशील जीवन सर्व प्राणी मात्रांचे असते. पण विचाराने क्रियेत परिवर्तन करणारे जीवन मात्र माणसाचेच. मनुष्य आपले जीवन सुखमय बनवू शकतो. विश्वात्मक देव माणसाच्या अंत:करणात आहे. तसेच हे विश्व ही माणसाच्या अंत:करणात साकारलेले आहे.

विश्वं दर्पण हश्यमान नगरी तुल्यं निजान्तर्गतम्।

परपन्नात्मनि मायया बहि रिवोद्भूतं यथा निद्रया। श्रीमत शंकराचार्य. भासमान विश्व हे आपल्या आतच असते. स्वप्नात आतली वस्तू मनावर उद्भासित होते तसे माया निद्रेय हे विश्व भासमान होते. विश्वात्मक असतो तेथेच विश्वही आहे. परमात्मा अंतर्यामी तर विश्वही अंतर्यामी, अंतरंगातील बोधच विवेकाला चालना देतो. तेव्हा तेथेच असणारा विश्वात्मक देव आत्मिक भक्तीने युक्त होऊन अंत:करणात साकारलेल्या विश्वाचे नियमन करतो.

सांप्रत काळी मोठा मनुष्य म्हणजे वरच्या दर्जाचा सुधरलेला प्राणी असतो. प्रार्थना ही आदर्शाकडे जाण्याची प्रेरणा जिवंत ठेवीत असते. निष्ठा जागृत ठेवते. पसायदान ही समग्र विश्वाची प्रार्थना आहे.

या लेखातील विचार ह. भ. प. कै. धुंडा महाराज देगलूरकर यांच्या ''पसायदान'' या पुस्तकाच्या साहाय्याने संपादित करण्यात आले आहेत.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

**बेनॉइट यांचे निधन**

''जगातले आजचे सर्व आर्थिक गुंतवणुकदार व अर्थव्यवहार हे हवामानाचे भाकित माहित नसणाऱ्या नाविकांप्रमाणे दिशाहीन झाले आहेत.'' असे उद्‌गार चार वर्षांपूर्वी बेनॉइट मँडेलब्रॉट या गणितज्ञाने आर्थिक मंदीच्या संदर्भात काढले होते. वयाच्या ८५ व्या वर्षी या जगप्रसिद्ध गणितज्ञाचे १४ ऑक्टोबर २०१० रोजी निधन झाले (१९२४ ते २०१०) त्यांना वुल्फ प्राइझ मिळाले तेव्हा त्यांचा ''निसर्गाकडे (जगाकडे) पाहण्याचा आपला दृष्टिकोन त्यांनी बदलून टाकला'' या शब्दांत गौरव करण्यात आला होता. गणित जेव्हा रेषा, प्रतल व परिघ यांवर विचार करत होते, तेव्हा या विचारांना छेद देत जग हे अशा ठराविक आकारांचे नसते, हे मत त्यांनी मांडले होते त्यांना 'फ्रॅक्टल जीओमीटर्स' या भूमितीमधील विशेष शाखेचे जनक मानण्यात येते

(संदर्भ - 'नेचर' खंड ४६८ १८ नोव्हे २०१० - पृ. ३७८)

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**२५४२ ६२७०**

# मराठी कवितेचा प्रवास

*मराठी काव्य प्रवाहाचे हे धावते विहंगमावलोकन - संपादक*

मराठी साहित्यामध्ये कविता हा एक अत्यंत प्राचीन, समर्थ, समृद्ध आणि सुंदर प्रकार आहे. प्राचीन मराठी काव्य झऱ्याचे आद्य स्थान म्हणजे आद्यकवी मुकुंदराज यांचा 'विवेक सिंधू' हा आद्य काव्य ग्रंथ होय. मराठी मातीत जन्माला आलेली महानुभाव पंथीय विदुषी महदंबा ही केवळ मराठीमधीलच आद्य कवयित्री आहे असे नाही तर, हिंदी कवितेतील आद्य कवयित्रीचा मानही या मराठी कवयित्रीकडे जातो.

स्वरसौंदर्य आणि अर्थ माधुर्याचे मधुर चांदणे आपल्या काव्यातून शिंपणाऱ्या कवी नरेंद्र आणि भास्कर भट्ट बोरीकर यांची कविता मराठी कवितेचे एक महत्त्वपूर्ण दालन आहे.

प्राचीन मराठी काव्यसरिता पुढील काळात संत, पंत आणि तंत अशी वळणे घेत वाहत राहिली. प्राचीन मराठी कवींचे मुकुटमणी संत ज्ञानेश्वर यांची कविता तर मराठी कवितेचे विलोभनीय लेणे म्हणता येईल. नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा या सर्वच संतांनी ओवी अभंगाच्या माध्यमातून भक्तीच्या भगव्या धाग्यातून फुलांच्या माळा निर्माण केल्या. आत्माविष्कार हे या सर्व कवितेचे वैशिष्ट्य. संत कवितेत जिवतपणा आणि झळझळत्या झऱ्याचे सौंदर्य आहे. या संत कवितेला एकतारी आणि चिपळ्या किंवा टाळ, विणा आणि मृदुंग यांचे संगीत ही असे म्हणता येईल.

प्राचीन काळी कवितेच्या प्रवासाविषयी तिची संत कवींची मराठी कवितेला वारकरीण बनवले. पंडित कवींनी तिला विविध अलंकारानी पंडित केले तर शाहीरांनी तिच्या पायात चाळ बांधून तिला नाचायला लावले. केशवसुतांनी तिला घरंदाज स्त्रीचे रुप दिले. या काव्य प्रवासाचे त्यांच्या स्वरूपानुसार आणखी वेगळ्या पद्धतीने वर्णन केले जाते ते म्हणजे प्राचीन मराठी कविता कामीनीचा पदर संत काळात डोईवर होता. पंडित काळात तो डोईवर असलेला पदर खांद्यावर पडला आणि शाहीरी काळात मराठी कविता कामिनीचा पदर खांद्यावर देखील राहिला नाही.

संत कवितेत भक्ती आणि शांत रस तर पंडिती कवितेत नवही रसांना प्राधान्य दिले गेले आणि श्लोक आणि आर्यामधून त्यांनी काव्याभिव्यक्ती केली शाहीरांनी मात्र लावणी आणि पोवाडा या काव्यप्रकारातून शृंगार वीर रसांची उधळण केली.

संत आणि पंत कवितेत कविता ही देव केंद्री होती. शाहीरी कवितेत ती देहकेंद्री झाली. पुरुषी राकटपणा, रंगेलपणा आणि पराक्रम तसेच स्त्रीचे लावण्य हे केंद्रस्थानी आले. मराठीपणा, मराठीकणा, मराठ्यांचे मन आणि मराठ्यांचे मनगट याचे दर्शन शाहीरी कवितेतून घडते.

पुढचा काळ मराठीतील भाषांतर युगाचा काळ होय. एका बाजूला कृष्णशास्त्री चिपळूणकर, मोगरे, लेंभे इत्यादी कवी संस्कृतचे पाट मराठीत आणून सोडत होते तर कुंटे, महाजनी, कीर्तिकर सारखे सुशिक्षित कवी इंग्रजी कवींकडून मराठीचा साज शृंगार चढवीत होते. वर्डस्वर्थ, शेले या सारख्या इंग्रजी कवींकडून अनेकांनी स्फूर्ती घेतली होती.

याच काळात दुसरीकडे कवी 'अखंड'कार जोतीराव फुले आणि कवयित्री सावित्रीबाई फुले यांची कविता फुलत

होती. फुले आपल्या कवितेतून समता, बंधुता आणि मानवतेची शिकवण देत होते तर सावित्रीबाई सृष्टी सुंदर, मनुष्य सुंदर असे आपल्या कवितेतून मनुष्याचे गौरवगान गात होत्या. म्हणजे प्रथमच फुले दांपत्याने देव आणि देह केंद्रांकडून कविता 'माणूस' या केंद्रबिंदूकडे आणली.

या आधुनिक मराठी काव्य सरीतेत आणखी क्रांतीकारी भर घालण्याचे काम कविवर्य केशवसुतांनी केले. केशवसुतांची एक एक चांगली कविता हा एक नवा प्रत्ययकारी प्रबोधक शोधच आहे. 'नवा शिपाई,' 'तुतारी'चा निनाद गडकरी, रे. टिळक यांच्या कवितेतही ऐकायला मिळाले. प्राप्तकाळ हा 'विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा 'अशी कृतिशूर आवाहकता केशवसुतांच्या कवितेत होती.

१८८५ ते १९२० हा आधुनिक मराठी कवितेचा क्रांतिकाळ मानला जातो. पहिली पिढी म्हणजे केशवसुत आणि त्यांचे समकालीन ना.वा. टिळक, माधवानुज, दत्त, विनायक, लक्ष्मीबाई टिळक हे होते.

दुसऱ्या पिढीमध्ये कवीवर्य गोविंदाग्रज, रेंदाळकर, बी आणि बालकवी यांचा उल्लेख करावा लागतो. या कवींच्या कवितेचे स्वरूप हे स्फुट आणि- भावोद्‌गाराचे होते.

आधुनिक कवितेचा तिसरा कालखंड म्हणजे १९२० ते १९४५ हा होय. रविकिरण मंडळाचे मराठी काव्यपरंपरेतील कार्य महत्त्वपूर्ण आहे. कवी माधव ज्यूलियन, गिरीश, यशवंत, श्री. रानडे, ग. त्र्यं. माडखोलकर, नाट्यकार दिवाकर यांचा उल्लेख त्यामध्ये करावा लागेल. यामध्ये पटवर्धन, गिरीश, यशवंत यांनीच कवितेत मोलाची भर घातली. याच काळात भा.रा. तांबे सारखे गीतरचनाकार कवी आपला ठसा उमटवून गेले. नाट्यमाधुर्य हेच त्यांच्या कवितेचे सौंदर्य होय.

याच आसपासच्या काळात कुसुमाग्रज, अनिल, मुक्तिबोध, अनंत काणेकर काव्यात मोलाची भर घालत होते. मर्ढेकरांनी तर नवकवितेची मुहुर्तमेढ रोवली. आरती प्रभू, बापट, पाडगावकर, करंदीकर, शांता शेळके, इंदिरा संत यांनी पुढे मराठी कविता फुलविली.

१९६० नंतर 'मी कामगार आहे तळपती तलवार आहे, सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे.' असे म्हणत सुर्वे सारख्या कामगार कवींनी मराठी कवितेत प्रवेश केला.

१९६० नंतर एका बाजुला लघु नियतकालिकातील कवींची कविता तर दुसऱ्या बाजुला नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर यासारखे कवी लिहायला लागले.

आज आदिवासी कवी, भटके विमुक्त कवी, कवयित्री मोठ्या प्रमाणावर लिहीत आहेत. मराठी काव्य सरितेचे पात्र आता रुंदावतच चालले आहे.

- **प्रा. दामोदर मोरे**
मराठी विभाग प्रमुख
जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे

❖❖❖

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर पूर्व प्राथमिक विभाग

''येरे येरे पावसा तुला देतो पैसा''

या गाण्याच्या सुरात पावसाच्या साक्षीने व चिमुकल्या पावलांनी दि. १४/६/२०१० रोजी सकाळी १०.३० वाजता लहान शिशु व दुपारी १.३० मोठा शिशु भरला. गोळ्या वाटून मुलांचे स्वागत करण्यात आले.

दिनांक २१जून पासून शाळा नेहमीप्रमाणे सुरू झाली. गणवेश घालून शाळेत येताना मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद व उत्साह प्रकर्षाने जाणवत होता. दिनांक २१जून रोजी मोठ्या शिशुच्या वर्गाची दिंडी काढण्यात आली. सर्व मुले वारकरी वेशात खूपच छान दिसत होती. तसेच मुली सुद्धा नऊवारी साडी नेसून व तुळशी डोक्यावर घेऊन दिंडीत सामील झाल्या. जणूकाही पंढरीच अवतरली असा भास निर्माण झाला.

सोमवार दि. ९ ऑगष्ट रोजी शाळेच्या वेळातच दिव्यांची अमावस्या हा सण साजरा केला. सर्व प्रकारचे दिवे स्वच्छ धुऊन लावण्यात आले. सर्व गटातील मुलांनी एकत्र येऊन दिव्यांची पूजा केली व गाणी म्हणून त्यांना प्रसाद देण्यात आला.

शुक्रवार दि. १३ ऑगष्ट रोजी नागपंचमी साजरी केली. या दिवशी नागाची पूजा करून मुलांना नागपंचमीची कथा सांगितली. या छोट्या मंडळींनी सर्व नवीन असल्यामुळे ही मंडळी कुतूहलाने ऐकत होती.

गुरुवार दि. २ सप्टेंबर रोजी लहान व मोठ्या शिशुची दहिहंडी साजरी केली. या दिवशी सुद्धा मुले नटूनथटून आली होती. कोणी कृष्ण तर कोणी गोविंदाचे पथक बनून सज्ज होते. मुली राधेच्या वेषात इतक्या गोड दिसत होत्या की विद्यालंकार सभागृहात गोकुळनगरीच अवतरली होती. या दिवशी मुलांना दहीपोहे प्रसाद म्हणून देण्यात आला.

गुरुवार दि. ९ सप्टेंबर रोजी ''गणपती बाप्पा मोरया'' या जल्लोषात पूर्व प्राथमिक विभागात गणरायाचे आगमन झाले. दिव्यांची व फुलांची आरास करून बाप्पा मखरात विराजमान झाले. गणपतीची पूजा करून तालसुरांत सर्वांनी आरती म्हटली. प्रदूषण टाळण्यासाठी व त्याचे महत्व पटण्यासाठी प्रात्यक्षिकरीत्या म्हणून आम्ही शाडूच्या मातीची मूर्ती आणली व तिचे बादलीत विसर्जन करण्यात आले.

''हिरवे हिरवे गार गालिचे हिरवळ दाटे चहुकडे''

अशा ह्या सभोवताली असणाऱ्या मनमोहक वातावरणात व प्रसन्नतेत कोण मोहून जाणार नाही, असा हा श्रावण महिना. गोडधोडांनी व उत्साहाने परिपूर्ण असणारा महिना. ह्या महिन्यात येणाऱ्या प्रत्येक सणाचे महत्व पटवून देण्यासाठी आम्ही महत्त्वाचे सण साजरे करतो.

१५ ऑगष्ट रोजी आम्ही भोंडला केला. पाटावर हत्तीचे चित्र काढून त्याची पूजा करून चित्राभोवती फेर धरला व भोंडल्याची गाणी म्हटली. मुलांना खिरापत म्हणून भेळ दिली. त्याच दिवशी पाटीपूजन करून मुलांना प्रसाद म्हणून पेढा देण्यात आला.

लहानांपासून मोठ्यापर्यंतच्या उत्साहा, आनंदाला द्विगुणीत करणारा सण म्हणजे 'दिवाळी'. या वेळी सुद्धा सर्व मुले छान सजून आली होती. नवीन कपड्यांचा आनंद आपल्या मित्रमैत्रिणींकडे व्यक्त करत होती. आम्ही सर्व शिक्षकांनी मातीचा किल्ला केला होता. किल्ल्यांच्या बाजूना पणत्या लावल्या होत्या. किल्ल्यावर शिवाजी महाराज व मावळे ठेवण्यात आले होते. विद्यालंकार सभागृहात आकाश कंदिल व पणत्या यांच्या झगमगटात वातावरण मंगलमय झाले. मुलांची पंगत बसवून

रांगोळी काढली. त्यांना लाडू व चिवड्याचा फराळ देण्यात आला. ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी बिनआवाजाचे व शोभेचे फटाके लावले व मुलांना ध्वनिप्रदूषणाचे महत्त्व पटवून दिले.

मुलांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आम्ही दरवर्षी स्नेहसंमेलन आयोजित करतो. ह्या वेळी 'हसा खेळा नाचा' हा विषय दिला होता. मुलांनी ह्या कार्यक्रमांत आनंदाने सहभाग घेतला.

शालेय बाह्य स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी आम्ही मुलांना प्रोत्साहित करतो. 'चिल्ड्रन कला अॅकेडमीतर्फे' घेण्यात येणाऱ्या **रंगभरण व हस्ताक्षर** स्पर्धेमध्ये लहान व मोठ्या शिशुच्या मुलांनी सहभाग घेऊन घवघवीत यश संपादन केले. रंगभरण स्पर्धेत लहान शिशुच्या **१६ मुलांना सुवर्णपदक** व हस्ताक्षर स्पर्धेत मोठ्या शिशुतील **८ मुलांना सुवर्णपदक** मिळाले. तसेच सर्व मुलांना प्रशस्ति-पत्रके देऊन गौरवण्यात आले.

आजकालच्या विभक्त कुटुंबपद्धतीमुळे मुले हिंदूधर्माचे संस्कार व रूढी हरपून बसली आहेत आणि हे सर्व लक्षात घेऊन त्यांच्यावर चांगले संस्कार घडावेत म्हणून मुख्याध्यापिका वैद्य बाई व सर्व शिक्षक वरील उपक्रमांद्वारे मुलांना घडवण्यात सतत प्रयत्नात असतो.

**वृत्त संकलन – सौ. मनाली जयंत दिवेकर**
शिक्षिका, पूर्व प्राथमिक विभाग

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग

प्रतिवर्षीप्रमाणे आमच्या विद्यामंदिरामध्ये दि. ११सप्टेंबर रोजी श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत श्री विघ्नहर्त्या गणेशाचे आगमन झाले. एका बाळगोपाळाच्या हस्ते श्री गणेशाचे यथाशक्ती यथामती पूजन करण्यात आले. दोन्ही दिवशी सकाळ संध्याकाळ टाळांच्या गजरात उत्साहाने आरत्या करण्यात आल्या. मुख्याध्यापिका सौ. भंडारे बाईंनी श्रींच्या मूर्तीचे पूजन केले. दि. १२ सप्टेंबर रोजी बँड व लेझीमच्या तालावर वाजत गाजत मासुंदा तलावात जड अंतःकरणाने श्री गणेशाला निरोप देण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी दि. ८ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत घटस्थापनेपासून ते विजया दशमी पर्यंत श्री. सरस्वती देवीचा शारदोत्सव शाळेत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सजवलेल्या मखरात श्री सरस्वतीची स्थापना करून मुख्याध्यापिका सौ. भंडारे बाईंनी देवीची यथासांग पूजा केली. सकाळ व दुपार अधिवेशनातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी नऊ दिवस उत्साहाने देवीचे पूजन केले व आरत्या म्हटल्या. याच नऊ दिवसांत भोंडल्याचा उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांना खिरापत देण्यात आली. विजया दशमीच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी पाटी पूजन केले व त्यांना प्रसाद देण्यात आला. शारदोत्सोवात विद्यार्थ्यांना, आंतरशालेय विविध गुणदर्शन स्पर्धा घेण्यात आल्या.

शनिवार दि. २७ नोव्हेंबर रोजी शिक्षक – पालक सभा आयोजित करण्यात आली होती. त्यात इ. ३ री व इ. ४ थी च्या पालकांना मूल्यमापनाच्या सुधारित पद्धती बद्दल माहिती देण्यात आली. तसेच एस.एस्. टेक्नोलॉजी तर्फे इंग्रजी विषयाच्या अध्ययनाबद्दल पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. इंग्रजी बोलण्यातील अडथळे दूर करण्याबद्दल उपयुक्त अशी माहिती देऊन पालकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

सालाबादाप्रमाणे सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक स्नेह संमेलन व पारितोषिक वितरण समारंभ सोमवार दि. १३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे डॉ. सौ. शुभा चिटणीस व श्री. अशोक चिटणीस हे उपस्थित होते. त्यांनी मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. करंदीकर साहेब यांनीही विद्यार्थ्यांना व्यायामाचे महत्त्व व व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्पर्धांतील सहभागाचे महत्त्व समजावून सांगितले. क्रीडास्पर्धांची बक्षिसे देखील या वेळी

विद्यार्थ्यांना देण्यात आली. निसर्ग व त्यावर आधारित विविध कवींच्या कविता या विषयावर बहारदार असे नृत्याविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केले.

श्री समर्थ सेवक मंडळाची 'स्त्री कल्याण संघटना' यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत इ. ३री मधील कु. तेजस्वी विलास येवले हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

लायनेस क्लब ऑफ उपवन, ठाणे आयोजित 'आदर्श शिक्षक पुरस्कार' सोहळ्यात शनिवार दि. २५ सप्टेंबर रोजी आपल्या शाळेतील सौ. ललिता प्रभाकर फिरके यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. प्रमाणपत्र व चषक असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

इ. ३री व ५ वी मधील कु. निकेश सुनिल उफळे याने राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत रौप्य पदक पटकावले आहे.

'बाळू बाक्रे' स्मृतीप्रीत्यर्थ घेण्यात येणाऱ्या गायन स्पर्धेत इयत्ता २री तुकडी ५ मधील कु. सानिका महेश पाटील या विद्यार्थीनीला प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

आपल्या शाळेतील सौ. स्नेहल नंदकुमार कुडव व सौ. उर्मिला राजेश परदेशी यांनी या वर्षी एम्.एस्. सी.आय्.टी. हा संगणक अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून प्रथम श्रेणी संपादन केली.

राज्यशासनाच्या आदेशानुसार 'मनशक्ती केंद्र, लोणावळा' येथील साधकांनी शिक्षकांना गर्भावस्थेतील बालकांवर केले जाणारे संस्कार तसेच मुलांवरील ताण कमी करून यश प्राप्ती करण्याचे विविध उपाय इत्यादी विषयांवर आधारित मार्गदर्शन केले.

वृत्त संकलन - सौ. विजया भंडारे
मुख्याध्यापिका,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग

### आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत बाजी

'झाडे लावा, जीवन वाचवा' हा संदेश देण्यासाठी मुंबईच्या ऑल स्टार्स क्रिकेट क्लबने आझाद मैदानावर टी-२० ट्री लॅण्ड ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात आपल्या संघाने बाजी मारून या ट्रॉफीवर आपल्या शाळेचे नाव कोरले.

यात संघाचा कप्तान वैभव बोंगाणे व उपकप्तान ओंकार बोरकर यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली. कल्पेश रसाळ, अमेय अणेराव यांनी उत्तम फलंदाजी केली. अणेराव याने पाच बळी घेऊन 'मॅन ऑफ दी मॅच' चा पुरस्कार मिळविला. ट्रॉफी मिळवल्याबद्दल क्रीडा शिक्षक श्री. पांचाळ, क्रिकेट प्रशिक्षक दीपक पाटील यांचे आणि क्रिकेट संघाचे अभिनंदन!

### संविधान दिवस

दि. २६ नोव्हेंबर १० रोजी इ. १०वी अ, ड च्या विद्यार्थ्यांसोबत मा. मुख्याध्यापकांनी संविधान दिवस साजरा केला. ऋतुजा चंद्रराव, तनिषा देसाई, इशानी भावे, यश सारोळकर व मुग्धा झाडकर या विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व व वैशिष्ट्ये आपल्या भाषणातून व्यक्त केली.

मा. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून संविधान, त्याची अंमलबजावणी, सामान्य नागरिक व देशाची व्यवस्था यांचा सहसंबंध समजावून देत त्या संदर्भात आपली मते मांडली.

### पावसाळी क्रिडा स्पर्धा - खो-खो

ठाणे तालुका स्तरावर १४ व १७ वर्षाखालील मुलींचा विजयी संघ दि. ३ नोव्हेंबर रोजी जिल्हा विभागीय स्तरावर समर्थ व्यायाम मंदिर, शिवाजी पार्क येथे गेला होता.

१४ वर्षांखालील मुलींचा संघ सेमी फायनलपर्यंत

पोहोचला. तर १७ वर्षाखालील मुलींचा संघ प्रथम साखळीत खेळला.

**वैज्ञानिक प्रकल्प – इ. ९वी**

१८वी राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २०१० तर्फे होणाऱ्या बाल वैज्ञानिक प्रकल्पांतर्गत इ. ९वी मधील विद्यार्थ्यांनी 'मातीतील जैविक व अजैविक घटकांचा संबंध अभ्यासणे' हा प्रकल्प सादर केला होता.

या प्रकल्पाची राज्य स्तरासाठी निवड झाली आहे. राज्यस्तरासाठी हा प्रकल्प 'बुलढाणा' येथे सादर करण्यात येणार आहे.

या प्रकल्पात खालील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. श्रीहरी मुळगुंद, ऋषीकेश शिंदे, ओजस हळदणकर, तुषार सावंत, प्रणव नातू.

या सर्वांना श्री. शेलवले सर यांनी मार्गदर्शन केले.

**दि. १ नोव्हेंबर दिवाळी धमाका**

मुलांनी चुकत चुकत शिकावे या पद्धतीचे उपक्रम चालवणाऱ्या 'एन आय इ' तर्फे मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने शाळेतील शिक्षिकांच्या सहकार्याने कंदील तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विविध रंगसंगतीचे कागद घेऊन कंदील बनवण्यासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळला. घरी कंदील विकत आणला जातो. मात्र या वर्षी आपण स्वतः तयार केलेला कंदील लावता येईल, यामुळे बच्चे कंपनी भलतीच खूष होती. या कार्यशाळेनंतर काढलेल्या रांगोळ्यांभोवती दिव्यांची आरास करून 'एन आय इ' परिवारातर्फे दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यशाळेत सौ. साधना कारंडे-जोशी, सौ. कल्पना बोरवणकर या शिक्षिका सक्रिय सहभागी झाल्या होत्या.

**ज्यूडो क्रीडा स्पर्धा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या विद्यमाने तथा ठाणे महानगरपालिका जिल्ह्यामार्फत १४ वर्षाआतील वयोगटातील मुले/मुली जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेचे आयोजन दि. २७ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत नैना थोरात व श्यामल यादव या विद्यार्थिनी यशस्वी झाल्या. विभाग स्तरासाठी त्यांची निवड करण्यात आली. त्याबद्दल अभिनंदन!

**अविस्मरणीय क्षण**

'फूल टू धमाल' भाग २ ही स्पर्धा सुरू केली. त्यानिमित्ताने दि. १ डिसेंबर रोजी 'सकाळ' चे ब्रँड ॲम्बॅसॅडर सुप्रसिद्ध संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांचे शाळेत आगमन झाले. सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये झुंबड उडाली. शाळेचे मुख्या. श्री. गवई, प्रा. विभागाच्या मुख्या. सौ. भंडारे, शिक्षिका सायली माने, ज्योती केदारे, अपर्णा भट आदी या प्रसंगी उपस्थित होते.

सुरुवातीला शाळेतील विद्यार्थिनी प्राजक्ता कुलकर्णी, चेतना जंगले, प्रणिता काळभोर, प्रतिभा यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. गाण्याला संगीत देणे म्हणजे काय असते, हे सांगताना डॉ. सलिल कुलकर्णी यांनी प्राजक्ताने सादर केलेल्या कवितेला चाल लावून दाखवली. गाणी, नाटक अशी मौजमस्ती झाल्यावर सलिल काका 'सरां' च्या भूमिकेत शिरले. अन् विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञानावर आधारित छोटीशी प्रश्नमंजुषा त्यांनी घेतली. अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना छोटीशी भेट देऊन त्यांचा उत्साह वाढवला.

'आपले कला गुण जोपासा, सतत वाचन करा' असा प्रेमळ सल्ला देत त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांची तारीफ केली.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

Technology-A strategy for Safety in Infra-structure या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन शनिवार दि. २३ ऑक्टोबर रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे सकाळी ९.०० ते ५.०० या वेळेत करण्यात आले.

सदर परिषदेस प्रमुख अतिथी म्हणून श्री. व्ही.पी. सिंग, कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य पॉवर जनरेशन कं. लि. मुंबई हे उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून श्री. मनिषकुमार (व्हा. प्रेसिडेन्ट ITD सेमेंटेशन इंडिया लि. मुंबई आणि परिषदेचे अध्यक्ष म्हणून श्री. मा. य. गोखले (कोषाध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) हे हजर होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनाने झाली. प्राचार्य दि.कृ.नायक यांनी स्वागतपर भाषण करून परिषद आयोजनामागील पार्श्वभूमी स्पष्ट केली व तंत्रनिकेतनाचा थोडक्यात आढावा घेतला. प्रा. व्ही. एस. भाकरे यांनीही मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांची ओळख उपस्थितांना करून देण्यात आली. प्रमुख अतिथी आणि मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.



स्मरणिकेचे प्रकाशन करताना

डावीकडून डी.के. नायक (प्राचार्य वि.प्र.मं चे तंत्रनिकेतन, ठाणे), श्री. **मनिषकुमार** (व्हा. प्रेसिडेन्ट ITD सेमेंटेशन इंडिया लि.), **श्री. मा. य. गोखले** (कोषाध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे), **श्री. हरीदास चौधरी** (अग्निशमन सल्लागार आणि प्रमुख अग्निशमन अधिकारी MSEB), **प्रा. व्ही. एस. भाकरे**, Co-Convener आणि सन्माननीय प्राध्यापक इंडस्ट्री इंन्स्टिट्यूट इंटरॅक्शन) **सौ. एस. व्ही. खंडागळे** (सेक्रेटरी आणि लेक्चरर इन्स्ट्रूमेंटेशन विभाग)

---

दरम्यान वक्ते मनिषकुमार यांनी 'विकसनशील भारताला सोयी-सुविधेच्या जोडीला तंत्रज्ञानाची जोड देऊन प्रगतीला पोषक वातावरण करून तांत्रिक प्रगतीकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. बदलत्या तंत्रज्ञानाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे स्पष्ट केले.

परिषदेचे अध्यक्ष श्री. मा.य. गोखले यांनी सुरक्षिततेच्या तंत्रज्ञानाबद्दल विस्तृत विश्लेषण उत्तमप्रकारे उपस्थितांना करून दिले.

परिषदेच्या पुढील सत्रात श्री. मनिष शहा (डेप्युटी जनरल मॅनेजर, पवई इस्टेट मेंटेनन्स, लार्सन अँड टर्बो लि. मुंबई) यांनी सुरक्षितता फार महत्त्वाची असल्याचे सांगून अकुशल कामगारांमध्ये त्यांच्या कार्यस्थळांवर सुरक्षिततेविषयी जाणीव करून द्यावी. त्यांनी 'Sunday or Monday Safety has no holiday' वर भर देऊन उत्तम प्रकारे सादरीकरण केले.

'आग' या गंभीर समस्येवर विशेष लक्ष पुरविण्याबाबत व त्यासाठीच्या उपाय योजना करण्याबाबत श्री. ए.पी. मांडके (प्रमुख अग्निशमन अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे) यांनी सांगितले. त्यांनी आगीच्या वेळी कोणत्या क्रिया कराव्यात व कोणत्या क्रिया करु नयेत व शिवाय महाराष्ट्र आग प्रतिबंध आणि जीवन सुरक्षितता मेजर्स ॲक्ट २००६ या विषयीची माहिती करून दिली. श्री. टि. पी. राजशेटा (बिझनेस अँड टेक्नॉलॉजी कन्सलटंट, इक्विप रिसोर्स, ठाणे) यांनी आग विझविण्याच्या विविध तंत्रांची माहिती सादरीकरणाद्वारे उपस्थितांना करून दिली.

या सत्राचे काम श्री. डी. डी. काळे (कन्सलटंट-रिलायन्स व माजी विभाग प्रमुख U.I.C.T. मुंबई) यांनी पाहिले.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रांत उच्च स्तरावरील तज्ज्ञांचे चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्राचे काम प्रा. व्ही. एस. भाकरे यांनी पाहिले. डॉ. डी.डी. काळे यांनी 'Technology in Safety Polymeric Infrastructure' विषयी माहिती सांगितली. त्यांनी Polymers ची वैशिष्ट्ये, वापर आणि PVC मध्ये त्याचा विकास इत्यादी माहिती दिली.

श्री. ए.के. कुलकर्णी ( विभाग प्रमुख, सुरक्षितता, गॅमॉन इंडिया लि. मुंबई) यांनी बांधकाम स्तरावरील धोक्यांविषयी माहिती दिली. उदा. असुरक्षित प्रवेश, विद्युत सुरक्षितता इत्यादी.

गौरव बोरीकर यांनी कॉपोझिट तंत्रज्ञानावर भर दिला. शेवटी विश्वास केंकरे आणि प्रभाकर शर्मा यांनी "Futuristic Trend in Expoxies" विषयी माहिती दिली.

परिषद आयोजित करण्यामागील उद्देश 'प्रत्येक क्षेत्रात तांत्रिक प्रगती करीत असता त्यामागील प्राथमिकता ही सुरक्षिततेच्या तंत्रज्ञानाची जाणीव करुन देणे '

## विद्या प्रसारक मंडळ

### मराठीतील साहित्याची मराठीतून माहिती अनुपलब्ध
**- डॉ. विजय बेडेकर**

मराठीमध्ये प्रचंड साहित्य उपलब्ध आहे. मात्र त्या विषयी माहिती गोळा करायची असल्यास इंग्रजीचा वापर करावा लागतो. मूळ मराठी साहित्यातील माहिती आपल्याला इंग्रजीमध्ये सहज उपलब्ध होऊ शकते. मात्र तीच माहिती मराठीतून मिळत नाही. अशी खंत डॉ. विजय बेडेकर यांनी व्यक्त केली. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या संकलपनेतून साकारलेल्या मराठी साहित्याचा संक्षिप्त आढावा घेणाऱ्या प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

साहित्याला भाषा व संस्कृती नसल्यास ते साहित्य परावलंबी होते. यासाठी मराठी भाषा प्रमाणित करणे आवश्यक आहे. माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी सर्व भाषांमधील पुस्तके संगणीकृत करण्यासाठी प्रयत्न केले होते. मराठीतील तीनशे ते चारशे पुस्तके आपल्याला गणपुस्तकाच्या रूपात पाहायला मिळतात. यासाठी प्रत्येकाने मराठी साहित्याचे जतन करून मराठी भाषा पुढे नेण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे आवाहन डॉ. बेडेकर यांनी केले. या वेळी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृत्त संकलन - श्री. चंद्रकांत शिंगाडे
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे.

**राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आनि आयोजित करणारे देश**

| अ. क्र. | शहर | देश | इ.स. |
|---|---|---|---|
| १ | हमिल्तन | कॅनडा | १९३० |
| २ | लंडन | यु. के. | १९३४ |
| ३ | सिडने | ऑस्ट्रेलिया | १९३८ |
| ४ | आकलंड | न्यूझीलंड | १९५० |
| ५ | वान्स्कुवहार | कॅनडा | १९५४ |
| ६ | कार्डिफ | वेल्स | १९५८ |
| ७ | पर्थ | ऑस्ट्रेलिया | १९६२ |
| ८ | किंग्सन | जमैका | १९६६ |
| ९ | एडन बर्ग | स्कॉलंड | १९७० |
| १० | ख्रिस्तचर्च | न्यूझीलंड | १९७४ |
| ११ | एडमन | कॅनडा | १९६८ |
| १२ | ब्रिस्बेन | ऑस्ट्रेलिया | १९८२ |
| १३ | एडन बर्ग | स्कॉलंड | १९८६ |
| १४ | आकलंड | न्यूझीलंड | १९९० |
| १५ | विकतोक्योरिया | कॅनडा | १९९४ |
| १६ | कौलाम्पूर | मलेशिया | १९९८ |
| १७ | मान्चेस्तर | यु. के. | २००२ |
| १८ | मेलबोर्न | ऑस्ट्रेलिया | २००६ |
| १९ | नवी दिल्ली | भारत | २०१० |
| २० | ओहर ग्लाझो | स्कॉलंड | २०१४ |

मान्नीय डॉ. विजय बेडेकर
संपादक, 'दिशा'

श्री. मोहन पाठक
कार्यकारी संपादक 'दिशा'

स.न.वि.वि. पत्र लिहिण्यास करण कीं, ऑक्टोबर च्या 'दिशा' चे संपादकीय हे अत्यंत वाचनीय असून एक उत्कृष्ट संपादकीय म्हणून ते सतत स्मरणात राहील.

कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या जीवनमूल्यांचा पाया त्या समाजाच्या शिक्षणव्यवस्थेत असतो याची ब्रिटिशांना जाणीव होती. आणि म्हणूनच भारतास शिक्षित करण्याची गरज आहे असा खोटा पुकारा करून मेकॉले प्रणित शिक्षणपद्धतीच्या निमित्ताने भारतीयांची विचार पद्धती बदलून आमच्या सांस्कृतिक जीवनांतील जीवनमूल्यांनाही त्यांनी धक्के दिले.

ब्रिटिशांचा हा धूर्त डाव लोकमान्य टिळक, योगी अरविंद इत्यादी नेत्यांनी जाणला होता आणि म्हणूनच त्यांनी 'National Education must be on National Lines and under National Control.' असा आग्रह धरला. पुणे आणि कलकत्ता येथे राष्ट्रीय पद्धतीने शिक्षण देणाऱ्या संस्थांची निर्मिती केली आणि ब्रिटिश व्यवस्थेची लाट काही काळ तरी थोपवून धरली.

ब्रिटिश येण्यापूर्वी भारत किती साक्षर होता, भारताची शिक्षणव्यवस्था किती सक्षम होती ते आपल्या संपादकीयावरून समजले. आपण दिलेले दाखलेही अत्यंत बोलके आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमच्या नेत्यांनी जरी डोळ्यांवर झापडे ओढून पाश्चिमात्यांचे अंधानुकरण सुरू केले असले तरी ८० वर्षापूर्वी महात्मा गांधींना खऱ्या परिस्थितीची पूर्ण जाणीव होती हेही आपल्या संपादकीयावरून समजलं मात्र हे सत्य प्रमाणपूर्वक सिद्ध करण्याचा जो खटाटोप गांधीच्या काही सच्च्या अनुयायांनी केला तोही आज बासनात गुंडाळून ठेवला जावा हे आमच्या देशाचे दुर्दैव आहे.

अत्यंत परिश्रमपूर्वक योग्य ते दाखले देऊन आपण हे सत्य लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो.

तसेच, गेली १० वर्षे भारतीय संस्कृती आणि भारतीय विचारधारा यांचे दर्शन घडवून समाजाला 'दिशा' दाखवण्याचा जो स्तुत्य प्रयत्न आपण करत आहात त्याबद्दल धन्यवाद!

आपला

नरेंद्र नाडकर्णी



# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।२ ।।

दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चलां कल्पतरुं चे आरव । चेतना चिन्तामणीचें गांव । बोलते जे आर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखी । अखंडीत ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकी इये । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।। ९ ।।

## ❖ पसायदानाचा गद्य अर्थ ❖

आता यावर विश्व स्वरूप, सद्गुरु यांनी माझ्या वाग्यज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, कीं, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो!

तेव्हा सद्‌गुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्रं. १७९३ ते १८०१)

मुखपृष्ठवरून

**संपादकीय**

निर्णयाच्या समर्थनार्थ न्यायधीशांनी केला आहे. लग्न संस्थेचे 'संपूर्ण' अवमूल्यन करणारा हा निर्णय आहे. आपण काहीतरी क्रांतिकारक करत आहोत, हे दाखवण्याचा हा 'केविलवाणा' प्रयत्न आहे. हा प्रश्न एखाद्या महिलेच्या वा पुरुषाच्या जीवनशैलीचा नसून व्यापक समाज हिताचा आहे. लग्नसंस्था उध्वस्त झालेल्या पाश्चात्त्य देशांचे आज आपल्या समोर उदाहरण आहे. 'अंगवस्त्रांना' अशीच न्याय संस्थेने दिलेली सामाजिक प्रतिष्ठा, आणि वरील निर्णय हे नुसतेच दुर्दैवी नाहीत तर स्वैराचारी, दिशाहीन समाजाच्या रचनेची ही सुरुवातच आहे.

संस्कार आणि, नीतिनियमांच्या 'चौकटींचा' आदर करणारा समाजच 'भौतिक' वा 'अध्यात्मिक' जीवनाचा आनंद लुटू शकतो. 'जंगली' किंवा 'रानटी' समाज आणि 'सभ्य' समाज यांतील 'फरक' हा या यंत्रणेचाच असतो. दुर्दैवाने आजचा तथाकथित 'प्रगत' समाज हा मानवाच्या रानटी अवस्थेलाही लाज आणेल, अशा परिस्थितीत जगत आहे. आपल्या युग कल्पनेतील कलियुगीन समाजाचे वर्णन या समाजाला तंतोतंत लागू आहे. सर्व गुन्हे, अनैतिकता, मूल्यहीनता यांना सामाजिक दर्जा आणि नीतिनियम, संस्कृती यांना 'मागासलेल्या' समाजाचा दर्जा!! ही खरी आजच्या समाजाची शोकांतिका आहे. धटिंगण, गुंड, हावरे, लाचखोर ही भाषेतील सर्व विशेषणेही कमी पडतील असे आपले आजचे ग्रामपंचायतींपासून दिल्ली पर्यंतचे लोक प्रतिनिधी आहेत, (अपवाद वगळता). नैसर्गिक साधन संपत्ती व मानवी आयुष्य या दोन्ही गोष्टी सीमित आहेत, म्हणूनच मानवी 'लालसा' आणि 'हाव' यांना त्या बळी पडता कामा नयेत. पाच दहा पिढ्यांच्या फायद्यातोट्यापेक्षा संपूर्ण भविष्य काळाचा विचार होणे म्हणूनच आवश्यक असते. असा विचार जो समाज करू शकतो, तोच 'परिपक्व' समाज म्हणून जगू शकतो. अपत्य निर्मिती आधी आईवडिलांची जीवनशैली, खाणेपिणे या सगळ्यांचा परिणाम हा होणाऱ्या अपत्यावर होत असतो, हे आता विज्ञानाने सिद्ध केले आहे. म्हणूनच, आर्थिक क्षमता किंवा तरुणाईची क्षमता असली तरीही होऊ घातलेल्या आईवडिलांनी आपल्या क्षमतांच्या स्वातंत्र्याला 'आवर' घालून नियंत्रित जीवनशैली आचरावी लागते.

या विचारालाच 'आचारां' च्या चौकटीत 'बांधणे' म्हणजेच जीवन 'नीतिनियमां' मध्ये बंदिस्त करणे होय. ही व्यापक भूमिका समजातून न घेता अनिर्बंध 'उपभोग' किंवा 'स्वातंत्र्य' च्या प्रभावाखाली जेव्हा समाज जगतो तेव्हा मी भविष्य 'उध्वस्त' करण्याची नांदी असते. शतकानुशतकांच्या प्रयत्नांतून निर्माण झालेल्या रचनेत बदल करणे आवश्यक असतेच, पण बदल म्हणजे मोडतोड नाही. आजच्या सुधारणेचा ढाचा हा विधायकतेपेक्षा सामाजिक विध्वंसाकडे जाणारा आहे. असल्या सुधारणा या तात्पुरत्या 'पुरोगामी' वाटल्या, तरी त्या 'प्रतिगामी' असतात. जुने घर पाडायच्या आधी नवीन घराची रचना करावी लागते आणि हे काम एखाद्या वास्तुरचनाकाराकडूनच करून घ्यावे लागते. 'मनु' ला जाळणे सोपे असते. पण नवीन 'मनु' निर्माण करणे महाकठीण असते. घटना म्हणजे करारांची 'अनुक्रमणिका' असलेले पुस्तक नाही. अंमलात येऊ न शकणाऱ्या घटनेइतके धोकादायक शस्त्र नाही. घटनेच्या लेखकापेक्षा तिचे महत्त्व ती किती शतके जगू शकते याला आहे. घटना माणसाला 'संस्कारित' करू शकत नाही, तर संस्कारित माणूस 'गृहीत' धरून घटना लिहावी लागते, कारण बधिर, संवेदनाशून्य समाजात कोणतीही घटना कधीही यशस्वी होऊ शकत नाही. घटना ही व्यवहार्य आणि वास्तव असावी लागते. ती थोडी व्यक्त व जास्त अव्यक्त असावी लागते.

आजच्या भ्रष्टाचाराचा उगम हा अवाजवी, अवास्तव 'त्यागा' च्या कविकल्पना, आचरट 'प्रेम' आणि 'बेजबाबदार' स्वातंत्र्याच्या संकल्पनेत आहे. हे जेव्हा उमगेल तेव्हाच भ्रष्टाचारमुक्त समाज निर्माण होईल.

●●●